७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. ०७ जुलै २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १९२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये

# 'वर्क फ्रॉम होम' द्या : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (दै. संध्या)**



मुंबई-पुण्यासह राज्यभरात अनेक ठिकाणी पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचं चित्र आहे. हा पाऊस पुढचे दोन दिवस म्हणजे, 8 जुलै पर्यंत कायम राहण्याचा अंदाज आहे. अशा स्थितीत आपत्कालीन यंत्रणांनी 24 तास युद्धपातळीवर काम करावं, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. आवश्यकता असल्यास नागरिकांनी घराबाहेर पडावं, कर्मचाऱ्यांनी 'वर्क फ्रॉम होम'चा अवलंब करावा असंही मुख्यमंत्र्यानी सांगितलं.

मुंबई आणि पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात मान्सूनने रौद्र रूप धारण केले असून सर्वत्र पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवस म्हणजेच 8 जुलैच्या रात्रीपर्यंत राज्यामध्ये मुसळधार पावसाचा 'रेड अलर्ट' कायम राहण्याचा अंदाज वर्तवला आहे.

या गंभीर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य आपत्ती नियंत्रण कक्षामध्ये एक उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व खासगी कंपन्या आणि आस्थापनांना अत्यंत कडक निर्देश दिले आहेत.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, सद्यस्थिती पाहता खासगी कंपन्यांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांच्या कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम'ची सवलत द्यावी. ज्या कंपन्या किंवा आस्थापना या आदेशाचे पालन करणार नाहीत, त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा थेट इशारा मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला आहे. तसेच नागरिकांनी अत्यंत आवश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हा प्रशासनांना आणि आपत्कालीन यंत्रणांना 24 बाय 7 अलर्ट मोडवर राहण्याचे आदेश दिले आहेत. गेल्या 24 तासांत राज्याच्या अनेक भागांत भूस्खलनाच्या दुर्दैवी घटना समोर आल्या आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरही मोठ्या प्रमाणावर दरड कोसळून माती आणि मोठमोठे दगड रस्त्यावर आले आहेत. या ठिकाणी वाहतूक पूर्ववत करण्यासाठी संबंधित यंत्रणा युद्धपातळीवर काम करत असून, वाहतूक कोंडी सोडवण्याला प्राधान्य देण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. मुंबईसह किनारी भागातील जिल्ह्यांमध्ये ताशी 50 ते 70 किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. समुद्रात येणाऱ्या हायटाईडचा धोका लक्षात घेता NDRF आणि SDRF यांच्या पथकांना संवेदनशील भागात तैनात करण्यात आले आहे. बैठकीत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसराबाबत मोठी चिंता व्यक्त केली. अरबी समुद्रात निर्माण झालेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे नाशिक जिल्ह्यात मंगळवारी तब्बल 300 मिलिमीटरहून अधिक म्हणजे ढगफुटीसदृश पाऊस होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. हा पाऊस प्रामुख्याने त्र्यंबकेश्वर आणि आजूबाजूच्या डोंगराळ परिसरात कोसळू शकतो. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्हा प्रशासनाने पर्यटकांच्या सुरक्षेसाठी विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरडी कोसळण्याची ठिकाणे आणि बंद होऊ शकणारे रस्ते ओळखून पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात यावे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच पुढील काही दिवस पर्यटकांनी त्र्यंबकेश्वर आणि नाशिक परिसरातील पर्यटन स्थळांवर जाणे पूर्णपणे टाळावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाच्या वतीने केले आहे.

## जीव मुठीत धरून रेल्वे ट्रॅकवरून नागरिकांचा पायी प्रवास!

**मुंबई (दै. संध्या)**



मुंबईसह उपनगरांना पावसाने झोडपून काढलं असतानाच, वसई-विरार परिसरात मान्सूनने अत्यंत रौद्र रूप धारण केलं आहे. गेल्या 12 तासांत तब्बल 325 मिमी इतका रेकॉर्डब्रेक पाऊस कोसळल्याने वसई-विरार शहराला पुराच्या पाण्यानं वेढलं आहे. या मुसळधार पावसाचा सर्वात मोठा फटका पश्चिम रेल्वेला बसला असून नालासोपारा रेल्वे स्थानकासह अनेक ठिकाणचे रेल्वे रुळ पाण्याखाली गेले आहेत. रेल्वे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाल्यामुळे हजारो प्रवासी वेगवेगळ्या स्थानकांवर अडकून पडले आहेत. कोणतीही पर्यायी वाहतूक व्यवस्था उपलब्ध नसल्याने शेवटी हताश झालेल्या प्रवाशांना वसई ते नालासोपारा दरम्यान रेल्वे रुळांवरूनच पायी प्रवास करावा लागत असल्याचं एक अत्यंत हृदयद्रावक आणि धक्कादायक चित्र पाहायला मिळत आहे. डोक्यावर मुसळधार पाऊस आणि पायाखाली रेल्वे रुळांवर साचलेले पाणी अशा अत्यंत बिकट परिस्थितीत नागरिक जीव मुठीत धरून वाट काढत आहेत. वसई-विरारमधील अतिवृष्टीमुळे केवळ रेल्वेच नाही, तर रस्ते वाहतूकही पूर्णपणे कोलमडली आहे. रिक्षा, टॅक्सी आणि एसटी बस सेवा ठप्प झाल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. शहरात दुपारनंतरही पावसाचा कहर सुरूच असल्याने मुख्य महामार्गावर पाणी साचले आहे. परिणामी, अत्यावश्यक सेवा पुरवणारी वाहने शहरात येऊ शकलेली नाहीत. यामुळे वसई-विरारमध्ये आता दूध आणि भाजीपाल्याची तीव्र टंचाई निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. शहरातील अनेक सखल भागांमधील घरांमध्ये आणि तळघरात पुराचे पाणी शिरले आहे. बाजारपेठेतील दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. रात्रभरापासून सुरू असलेला पाऊस थांबण्याचे नाव घेत नसल्याने आता वसई-विरारकर नागरिक देवाकडे पाऊस थांबण्यासाठी प्रार्थना करत आहेत.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

## सावधान! खडकवासला धरणातून कधीही पाण्याचा विसर्ग शक्य

**नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये, प्रशासनाच्या सूचना**

**पुणे (दै. संध्या)**



पुणे जिल्हा आणि पश्चिम घाटमाथ्यावरील डोंगरी भागांमध्ये पावसानं अत्यंत रौद्र रूप धारण केलं आहे. सतत सुरू असलेल्या मुसळधार पर्जन्यवृष्टीमुळे पुणेकरांची पाण्याची चिंता मिटली असली, तरी पूर परिस्थितीचा धोका निर्माण झाला आहे. पुण्याची जीवनवाहिनी समजले जाणारे खडकवासला धरण 6 जुलै रोजी दुपारी 2 वाजेपर्यंत 32 टक्के क्षमतेनं भरलं आहे. धरण क्षेत्रात पडणारा पाऊस आणि पाण्याचा वाढता वेग पाहता, पुढील 24 तासांत हे धरण 80 टक्के किंवा त्याहून अधिक भरण्याची शक्यता आहे.

पावसाचा जोर असाच राहिल्यास धरणाच्या सांडव्यावरून कधीही नदीपात्रात पाणी सोडले जाऊ शकते. त्यामुळे जलसंपदा आणि पाटबंधारे विभागाने नदीकाठच्या गावांना आणि सखल भागातील नागरिकांना तात्काळ सतर्कतेचा इशारा (High Alert) दिला आहे. नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये, तसेच जनावरे आणि साहित्य सुरक्षित स्थळी हलवावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पुणे जिल्ह्याच्या पश्चिम घाटमाथ्यावरील अतिवृष्टीमुळे इंद्रायणी नदीने धोका पातळी ओलांडली आहे. इंद्रायणीचे हे सर्व पाणी भीमा नदीला येऊन मिळत आहे. सध्या दौंड बंधाऱ्यातून तब्बल 27 हजार 847 क्युसेक वेगाने भीमा नदीच्या पात्रात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे सोलापूर आणि पुणे जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या उजनी धरणाची पाणी पातळी आता झपाट्याने वाढू लागली आहे. नदीकाठच्या सखल भागातील नागरिकांना प्रशासनाकडून सुरक्षित स्थळी जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पूर परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि आपत्ती व्यवस्थापन पथक 24 तास परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

# धोकादायक पाऊस, लोणावळ्यात कलम १६३ लागू

## ३१ जुलैपर्यंत पर्यटकांना निर्बंध; पुणे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश



**पुणे (दै. संध्या)**

मुंबईसह पुण्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून वाहतूकव्यवस्था कोलडमडल्याचं दिसून येत आहे. पावसामुळे लोणावळा आणि मावळ तालुका परिसरात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी लोणावळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 च्या कलम 163 अंतर्गत आदेश लागू केले आहेत. कलम 163 म्हणजे पर्यटनावर बंदी नसून पर्यटकांसाठी सुरक्षेच्या दृष्टीने निर्बंध लावण्यात आलेत. 6 जुलै रात्री 12 वाजल्यापासून 31 जुलै सकाळी 6 वाजेपर्यंत हे निर्बंध लागू राहणार आहेत. त्यामुळे, आता लोणावळ्यात येणाऱ्या पर्यटकांना धबधब्याच्या ठिकाणी किंवा धोकादायक पॉईंटवर जाता येणार नाही. तसेच, अशा ठिकाणी जाऊन सेल्फी काढणे किंवा व्हिडिओग्राफी, रिल्स बनवणे बंधनकार करण्यात आलंय. लोणावळ्यातील एकवीरा देवी, भुशी धरण, लायन्स पॉईंट, टायगर पॉईंट, पवना धरण, लोहगड, विसापूर, तिकोणा, तुंग किल्ला आणि इतर पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात पर्यटक येत आहेत. मात्र, अतिवृष्टीमुळे अपघातांचा धोका वाढल्याने प्रशासनाने हे निर्बंधांचे पाऊल उचलले आहे. दरम्यान, पावसाळ्यातील पर्यटनाचा आनंद घेताना जीव धोक्यात घालू नका, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेत. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. लोणावळा–कर्जत दक्षिण-पूर्व घाट विभागातील मंकी हिल आणि खंडाळा स्थानकांदरम्यान १२१ व १२३ कि.मी. परिसरात युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू आहे. दरड कोसळल्याने रेल्वे रुळांवर आलेला मातीचा ढिगारा, दगड आणि मोठे खडक हटविण्याचे काम रेल्वे प्रशासनाकडून सुरू आहे. रेल्वेचे अभियांत्रिकी विभाग, कर्मचारी आणि यंत्रसामग्रीच्या मदतीने मार्ग पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कामात अडथळे येत असले तरी सुरक्षिततेचे सर्व निकष पाळून काम सुरू आहे. मार्ग लवकरात लवकर वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून युद्धपातळीवर प्रयत्न केले जात आहेत.

**पर्यटकांवर कोणते निर्बंध लावण्यात आलेत?**

- 6 जुलै मध्यरात्री ते 31 जुलै सकाळी 6 वाजेपर्यंत 163 कलम लागू
- धबधबे, ओढे, नदी, धरणात उतरण्यास बंदी
- धोकादायक कड्यांवर सेल्फी, व्हिडिओ शूटिंगला मनाई
- नैसर्गिक धबधब्यांमध्ये प्रवेशास बंदी
- मद्यपान, ध्वनीप्रदूषण, कचरा टाकण्यास बंदी
- महिलांची छेडछाड, बेजबाबदार वाहनचालकांवर कारवाई
- धरण आणि नदीकाठ परिसरात चारचाकी आणि सहाचाकी वाहनांना प्रवेशबंदी


**ढिंग-टांग**




## ५ चिमुकल्यांसह ६ जणांचा दुर्दैवी मृत्यू, मुख्यमंत्र्यांकडून ५ लाखांची मदत

# तीन मजली चाळ पत्त्यासारखी कोसळली

**मुंबई (दै. संध्या)**



राज्यभर सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत आणखी एक भीषण दुर्घटना घडली आहे. मानखुर्दमधील जनता नगर परिसरात रविवारी रात्री तीन मजली कच्च्या चाळीचा भाग अचानक कोसळल्याने पाच निष्पाप लहान मुले आणि एका महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर एक तरुण जखमी झाला आहे. ही चाळ धोकादायक असल्याने रहिवासी घरातील सामान बाहेर काढत असतानाच अचानक संपूर्ण बांधकाम कोसळल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

दुर्घटनेनंतर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, मुंबई अग्निशमन दल, पोलीस, महानगरपालिका आणि रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. युद्धपातळीवर बचावकार्य राबवून ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यात आले. आता बचावकार्य पूर्ण झाले असून ढिगारा हटविण्याचे काम सुरू आहे. रविवारी (5 जुलै) रात्री साडेआठच्या सुमारास मानखुर्दमधील हनुमान मंदिराजवळील जनता नगर परिसरातील चाळ क्रमांक 5 मध्ये ही दुर्घटना घडली. तळमजल्यासह तीन मजली कच्च्या बांधकामातील दोन ते तीन घरे क्षणार्धात कोसळली. ढिगाऱ्याखाली अनेक रहिवासी अडकले. माहिती मिळताच बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली आणि बचावकार्य सुरू करण्यात आले.

जखमींना तातडीने गोवंडी येथील पंडित मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालय आणि घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या एका महिलेसह तीन लहान मुली आणि एका लहान मुलाला मृत घोषित करण्यात आले. तर राजावाडी रुग्णालयात आणखी एका लहान मुलाचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या दुर्घटनेत एकूण सहा जणांचा मृत्यू झाला असून एका तरुणावर उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

# नाशिकवर ढगफुटीचं संकट!

## त्र्यंबकेश्वर अन् सप्तश्रृंगी मंदिर भाविकांसाठी बंद; शाळा-महाविद्यालयांना सुट्टी, जिल्हाधिकाऱ्यांचे मोठे आदेश

**नाशिक (दै. संध्या)**



नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरासाठी 7 जुलै रोजी ढगफुटीची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकाच दिवसात 300 मिमी इतका विक्रमी पाऊस कोसळण्याचा अंदाज जाहीर केल्यानंतर संपूर्ण नाशिक जिल्हा प्रशासन हायअलर्टवर आले आहे. या संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी ग्रामीण पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तातडीची पत्रकार परिषद घेऊन मोठे निर्णय जाहीर केले आहेत. प्रवाशांच्या आणि भाविकांच्या सुरक्षेचा विचार करून आज रात्रीपासूनच त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर आणि सप्तश्रृंगी मंदिर परवापर्यंत भाविकांसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती देताना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले की, "ढगफुटी पाऊस वॉर्निंग 7 जुलैला आहे, ती त्र्यंबकेश्वर, इगतपुरी आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर दरम्यानच्या भागात आहे. नाशिकचा पेठ तालुका या भागातही हा इशारा आहे. नाशिक, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर या तालुक्यात जास्त पाऊस होणार आहे. त्यामुळे नाशिक, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यातील आठवडे बाजार आणि शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनीही उद्या शेतीच्या कामासाठी बाहेर न पडता घरीच थांबावे. खबरदारी म्हणून काही रस्ते पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. आज रात्रीपासून त्र्यंबकेश्वर देवस्थान बंद राहणार असून परवापर्यंत मंदिर बंद राहील. सप्तश्रृंगी गड येथेही 65 मिलिमीटर पाऊस होण्याचा अंदाज आहे, तिथे जरी जास्त पाऊस नसला तरी सुरक्षेचा उपाय म्हणून सप्तश्रृंगी मंदिरही बंद राहणार आहे. नद्यांचा फ्लो कायम राहील, त्यामुळे नदीपात्रात कुठे अडथळा असेल तर ते दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पूरग्रस्त भागातील पशुधनाचे गोठे स्थलांतरित करण्याच्या सूचना आहेत. ज्या गावांमध्ये दगड किंवा दरड पडण्याची शक्यता आहे, अशा गावांना आधीच सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद पुढे म्हणाले की, पेठ, दिंडोरी, नाशिक ग्रामीण, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी येथील शाळा आणि महाविद्यालये पूर्णपणे बंद राहतील. धबधब्यांच्या ठिकाणी विशेष सुरक्षा कर्मचारी तैनात राहतील. तसेच छोटे पूल आणि साकव परिसरात कर्मचारी सतर्क राहणार आहेत. इगतपुरी भागातील रेल्वे विभागाला हवामानाच्या परिस्थितीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. कोणतीही दुर्घटना घडणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जात आहे. गड, किल्ले आणि धबधब्यांच्या ठिकाणी नागरिकांनी अजिबात जाऊ नये. पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन यांची कंट्रोल रूम तयार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची मदत घेतली जाणार आहे. प्रशासनाला ज्या ज्या यंत्रणा लागणार आहेत, त्या सर्व आम्ही पुरवणार आहोत. आज रात्रीपासून परवापर्यंत जिल्हा अलर्टवर राहणार आहे. त्र्यंबकेश्वरमधील काही गावांचे रोड बंद ठेवणार आहोत. कमकुवत स्ट्रक्चर किंवा गोठे असतील तिथे विशेष काळजी घेतली जाईल. नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीमध्ये 112 आणि 108 या नंबरवर संपर्क साधावा. नाशिक शहराच्या बाबतीत महापौर आणि मनपा आयुक्त स्वतंत्र निर्णय घेतील.

## संपादकीय

# पहले भी यूँ तो बरसे थे बादल...

पाऊस सुरू झाला की, 'मंझिल' चित्रपटातील अमिताभ बच्चन व मौशमी चॅटर्जी यांच्यावर चित्रित झालेले 'रिमझिम गिरे सावन...' हे गाणे दरवर्षी सर्वांच्याच ओठांवर येते. दोन वर्षांपूर्वी शैलेश-वंदना इनामदार या दांपत्याने मुंबईतील त्याच सर्व स्थळी जाऊन हे गाणे स्वतःवर त्याच शैलीत पुनर्चित्रित केले होते. तो सर्वांच्याच औत्सुक्याचा विषय ठरला होता. या दाम्पत्याने या गीतातील अवखळ व रोमँटिक भाव आपल्या वयाच्या साठीतही चपखल टिपले होते, साकारले होते. त्या १९७९ मध्ये चित्रित झालेल्या गीतातील मुंबई आपल्या सर्वांना आजही तशीच दिसते का, तशी जगता येते का, हा रुक्ष प्रश्न आज निश्चितच मनात येतो. त्यामुळेच 'पहले भी यूँ तो बरसे थे बादल...' या ओळींपाशी थोडे थबकून आपण विचारात पडतो... पूर्वीही ढग बरसायचे, पाऊस यायचा, मग आताच का तो पहिल्याच ओंजळीत धिंगाणा ठरू लागला?

या गाण्यात चित्रित झालेले मरिन ड्राइव्ह, गेटवे ऑफ इंडिया ही ठिकाणे पावसाची मजा लुटण्यासाठी नेहमीच सर्वांना खुणावतात. पावसाची एखादी लाट क्वीन्स नेकलेस ओलांडून कैवल्यधामच्या पदपथावरही तुम्हाला भिजवते, तेव्हा तुम्ही अवाक् होता; परंतु या सर्व ठिकाणी पावसाळ्यातील लाटा, सोसाट्याचा वारा अनुभवल्यावर अनेकांच्या मनांत धस्स होते. खरेतर इतक्या विलंबाने आलेला पाऊस बरसल्यावर त्याचे मुंबईकरांना मनमुराद स्वागत करता यायला हवे होते; परंतु त्यांनी पावसाचा धसकाच अधिक घेतला आहे.

पहले भी यूँ तो बरसे थे बादल... हो हे तर खरेच. पूर्वीही अशी मुंबई बंद पडण्याइतकी ढगफुटी व्हायची नाही का मुंबईत? नक्कीच व्हायची. जुलै महिन्याच्या मध्यास असा बदाबदा पाऊस कोसळायचा. मग दक्षिण मुंबईत नळबाजार, भेंडीबाजार, नागपाडा, ताडदेव, हिंदमाता, किंग्जसर्कल अशा भागांत पाणी साचायचे. बेस्ट बसेस त्यातूनही लाटा मागे सरत बदलत्या रूटवरून मार्ग काढायच्या. पूर्वीच्या मिणमिणत्या दिव्यांच्या आणि वायुवीजन कमी असलेल्या लोकलगाड्या शीव-कुर्ला दरम्यान मान टाकायच्या. मग दक्षिण मुंबईत कार्यालयापर्यंत पोहोचलेले उपनगरवासी आपल्या गिरगाव-गिरणगावातल्या चाळकरी नातलगांकडे मुक्काम ठोकायचे. पब्लिक टेलिफोनवरून कसेबसे शेजाऱ्यांकडे आपले कुशल कळवायचे. 'मुंबई ही सात बेटांची बनलेली आहे आणि तासाभरात १०० मिलिमिटर पाऊस झाला तर, पाणी तुंबणारच,' असे चाकोरीतले उत्तर दर वर्षी नवनवे महापालिका आयुक्त पत्रकारांना द्यायचे. ब्रिमस्टोवॅड प्रकल्प पूर्ण झाला तरच फरक पडेल, अशी आशाही नंतर काही आयुक्त दाखवू लागले. लोहमार्गाची उंची सहा इंचाने वाढवली, तर रेल्वे बंद पडणार नाही, असे रेल्वेचे अधिकारी सांगायचे. मिलन सबवे पाण्याखाली गेलाय का, शीव-कुर्ला ट्रॅक पाण्याखाली गेलाय का, हे पूर्वी नियंत्रण कक्षाला पावसाची खरी खबरबात विचारण्याचे पत्रकारांचे परवलीचे प्रश्न असायचे.

कालांतराने रेल्वेट्रॅक वर उचलले गेले, फलाटांची उंची वाढली, ब्रिमस्टोवॅड पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले, हिंदमाता-किंग्जसर्कल टाळणारे आणि इतर मिळून ५५ उड्डाणपूल अवतरले. चारचे सहा ट्रॅक झाले, मेट्रो साकारली. मग आता तरी ही पावसातली त्रेधातिरपिट थांबायला हवी होती ना? अगदी १९७९ मधली 'मंझिल' सोडा; पण मुंबईकरांचा पावसाळा थोडा तरी सुखद व्हायला नको का? लोकलमधून बसल्या जागी आपले क्षेमकुशल कळवायला आज हाताशी मोबाइल आलेत; परंतु लोकलमधले दरवाजे लावण्यासाठी आवाज द्यायलाही आज लोक चार वेळा विचार करू लागलेत. गर्दीमधून तुम्हाला तुमच्या स्टेशनावर उतरण्यास मदत करणारी माणसे हरवली आणि धारदार शस्त्रे बाळगणारे प्रवासी कधी शिरले? छोट्या बच्चे कंपनीला साचलेल्या पाण्यात कागदाची होडी सोडण्याचा आनंद मिळे. आता तिथे कुठल्याशा वायरचा करन्ट नाही ना, अशी भीती पालकांना सतावते.

## संस्कृत सुभाषित

दुर्जनोनार्जवंयाति सेव्यमानोऽपि नित्यश:।
स्वेदनाभ्यज्जनोपायै: श्वपुच्छमिव नामितम्॥

अर्थ : तेलाने चोळून, अभ्यंगस्नान घालून नंतर दाबून ठेवूनही कुत्र्याचे सरळ करुन ठेवलेले शेपूट पुन्हा वाकडेच राहते तसे दुर्जनाची कितीही सेवा केली तरी त्याचे वर्तन सरळ होत नाही.

## गुरु वचन

### खरा धर्म, संसाराची सेवा करणे

एकदा एक गुरू आपल्या काही शिष्यासोबत मेळ्यात गेले. त्यांनी पाहिले की, एका जागेवर बसून काही बाबा माळा फेरत होते. त्यांनी आपल्या समोर एक चादर अंथरलेली होती ज्यावर येणारे-जाणारे लोक पैसे टाकत होते. साधु डोळे बंद करून बसले होते जसे ध्यानात मग्न आहे. परंतु मधुन-मधुन ते थोड्यावेळेसाठी डोळे उघडून समोर अंथरलेल्या चादरीवर पाहत होते की, त्यावर किती पैसे जमा झाले. साधु असे करत होते हे पाहुन गुरू हसले. त्यांनी शिष्यांना पुढे चालण्यास सांगितले. पुढे एक तपस्वी शिर्षासन करत होते. तेथे खूप गर्दी जमा झाली होती. त्याला पाहून गुरूने जोरजोरात हसणे सुरू केले. पुन्हा ते आपल्या शिष्यांना घेऊन पुढे निघाले. पुढे एक पंडीत भगवत कथा सांगत होते. त्यांच्या समोर चेल्यांची मंडळी बसलेली होती. अधुन-मधुन जयकार लावुन आणि कीर्तन देखील करत होते. पुन्हा-पुन्हा कथाचे आयोजक लोकांना श्रद्धा-भक्तिपूर्वक दान देण्याचे निवेदन करत होते. कथाचे कार्यकर्ता दानपात्र घेऊन श्रोतांमध्ये फिरत होते आणि कथा ऐकणारे भक्त त्या पात्रात काही ना काही टाकत असे. त्याला पाहून गुरू पुन्हा खीळखीळून हसले.

त्याच्या पुढे एका चिकित्सा शिबिरात एक चिकित्सक रूग्णांच्या सेवेत लागलेला होता. गुरू काही वेळेपर्यंत तेथे थांबले. त्यांच्या डोळ्यात आश्रू आले. आश्रमला परत आल्यानंतर शिष्यांनी गुरूना पहिल्या तीन ठिकाणांवर हसणे व चौथ्या ठिकाणावर रडण्याचे कारण विचारले; तर गुरूने उत्तर दिले. आज माळा, आसन, प्राणायाम व भगवत कथेलाच धर्म समजून जास्त लोक सोंग करत आहे. हे पाहून मला हसू आले, तसेच भगवानचे कार्य करणारा फक्त एक चिकित्सक दिसला. हे पाहून दु:ख झाले की, लोक धर्माचे वास्तविक अर्थाला कधी समजतील? खरा धर्म संसाराची सेवा करणे आणि त्याला सुधारणे आहे, जप तप करणे नव्हे. गुरूच्या बाबींमध्ये सर्व शिष्यांना आपल्या प्रश्नाच्या उत्तरासोबत धर्माचा वास्तविक अर्थ समजण्याचा ज्ञान मिळाले.

## उपदेशकथा

### ईश्वरदर्शनाची आस

समुद्रामध्ये कालव नावाचा शिंपल्यात राहणारा एक प्राणी असतो. एक कालव त्याच्या मित्र कालवाला म्हणाला, 'अरे, काय सांगू? माझ्या अंतरंगामध्ये एक मोठे दु:ख आहे. ते जड आहे व वाटोळे व तेजस्वी आहे. पण त्यामुळे मी अगदी हैराण झालो आहे. 'दुसरा कालव अंतरंगामध्ये मोकळा होता. तो म्हणाला, 'माझ्याकडे बघ. मला आतील वेदना नाही. म्हणून मी आपला सुखी आहे.' एका देवदूताने हे संभाषण ऐकले. तेव्हा तो म्हणाला, 'येथून तेथे जीवप्राणी सर्व सारखेच. प्रत्येकाच्या अंतरी ईश्वरदर्शनाचे मोती निर्माण करण्याची क्षमता नसते. जे भाग्यवान असतात त्यांच्या अंतरी ते तयार होते. पण त्यासाठी वेदना सोसावी लागते.'

कथा उपदेश : संतांच्या जीवनाला हा नियम प्रकर्षाने लागू पडतो. जुने वितळून टाकण्यास मानसिक कष्ट सोसावे लागतात.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:शोभन १४:३०:२५ |
| ७जुलै २०२६ | करण:बव १३:२५:१२ |
| मंगळवार | करण:बालव |
| विक्रम संवत्– २०८२ | २४:५८:४४+ |
| निज ज्येष्ठशके | सूर्य:मिथुन |
| संवत्– १९४८ | चन्द्र:मीन |
| संवत्सर –पराभवनाम | हिजरी सन् – १४४८ |
| अयन– दक्षिणयन | मुस्लिम मास – मोहरम |
| मास– निज ज्येष्ठ | तारीख – २१ |
| ऋतु– सौर वर्षा | विशेष |
| कृष्ण पक्ष | कालाष्टमी |
| तिथि:सप्तमी १३:२५:१२ | संत तुकाराम महाराज |
| नक्षत्र:उत्तराभाद्रपद | पालखी प्रस्थान – देहू |
| १६:२४:०० | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १००३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | | | 3 | | | 2 | |
| | 2 | 8 | 9 | 4 | | | | 6 |
| 3 | | 4 | | 8 | 2 | | 5 | 7 |
| 1 | | | | | | | | 5 |
| 8 | | | 7 | | 5 | | | 3 |
| 9 | | | | | | | | 2 |
| 2 | 8 | | 4 | 1 | | 7 | | 9 |
| 4 | | | | 7 | 9 | 5 | 3 | |
| | 3 | | | 5 | | | 4 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १००२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 3 | 6 | 7 | 2 | 1 | 8 | 9 | 4 |
| 7 | 8 | 1 | 9 | 5 | 4 | 6 | 2 | 3 |
| 9 | 2 | 4 | 6 | 3 | 8 | 5 | 1 | 7 |
| 8 | 5 | 2 | 4 | 7 | 6 | 9 | 3 | 1 |
| 6 | 1 | 7 | 3 | 9 | 2 | 4 | 8 | 5 |
| 4 | 9 | 3 | 8 | 1 | 5 | 2 | 7 | 6 |
| 1 | 4 | 9 | 5 | 8 | 3 | 7 | 6 | 2 |
| 3 | 6 | 8 | 2 | 4 | 7 | 1 | 5 | 9 |
| 2 | 7 | 5 | 1 | 6 | 9 | 3 | 4 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४५६ – निधनच्या २५ वर्षानंतर जोन ऑफ आर्कला निर्दोष ठरवण्यात आले.
- १५४३ – फ्रांसने लक्झेम्बर्गवर आक्रमण केले.
- १६६८ – ट्रिनिटी कॉलेजने सर आयझेक न्यूटनला एम.ए.ची पदवी प्रदान केली.
- १७७७ – अमेरिकन क्रांती – हबार्टनची लढाई.
- १७९९ – रणजीतसिंहच्या सैन्याने लाहोरला वेढा घातला.
- १८०७ – तिल्सितचा तह – फ्रांस, रशिया व प्रशियातील युद्ध समाप्त.
- १८४६ – अमेरिकन सैन्याने कॅलिफोर्नियातील माँटेरे व येर्बा बोयना काबीज केले.

### राष्ट्रीय

- १८५४ – कावसजी दादर यांनी मुंबईत पहिली कापड गिरणी सुरू केली.
- १९१० – पुणे येथे इतिहासाचार्य वि.का. राजवाडे आणि सरदार खंडेराव मेहेंदळे यांनी ' भारत इतिहास संशोधक मंडळा'ची स्थापना केली.

### जन्म

- १०५३ – शिराकावा, जपानी स्म्राटाचा जन्म.
- ११९९ – सुटोकु, जपानी स्म्राटचा जन्म.
- १८४८ – फ्रांसिस्को दि पॉला रॉद्रिगेस आल्वेस, ब्राझिलचे राष्ट्राध्यक्षचा जन्म.
- १८५६ – जॉर्ज हर्न, इंग्लिश क्रिकेट खेळाडूचा जन्म.

### निधन

- १३०४ – पोप बेनेडिक्ट अकरावा यांचे निधन.
- १३०७ – एडवर्ड पहिला, इंग्लंडचा राजा यांचे निधन.
- १५७२ – सिगिस्मंड दुसरा ऑगस्टस, पोलंडचा राजा यांचे निधन.
- १९६५ – मोशे शॅरेड, इस्त्राइलचे दुसरे पंतप्रधान यांचे निधन.
- १९६७ – विव्हियन ली, इंग्लिश अभिनेत्री यांचे निधन.

## : SMS :

Soft Speech
Pure Heart
Peaceful Eyes
Strong Hands
Focused Mind &
Determined Decision
Always Make U
"Boring"
So, Chill Maro! Or
Jungli Ban k Jiyo!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.८ | २३.७ |
| अहमदनगर | २६.१ | २३.५ |
| अकोला | ३८.४ | २६.१ |
| अमरावती | ३६.६ | २५.८ |
| बीड | ३७.९ | २७.१ |
| भंडारा | ३४.८ | २६.९ |
| बुलढाणा | ४८.२ | ३६.७ |
| चंद्रपूर | ३७.१ | २७.२ |
| चेन्नई | ३८ | २९.४ |
| नवी दिल्ली | ४८.७ | ३७.४ |
| धुळे | ३९ | २६.६ |
| गोंदिया | ३१.८ | २६.५ |
| जळगाव | ३८.४ | २५.८ |
| कोल्हापूर | २४.९ | २३.५ |
| लातूर | २७.१ | २४.२ |
| मुंबई | ३४.२ | २७.८ |
| नागपूर | ३६.१ | २६.६ |
| नांदेड | ३४.१ | २५.८ |
| नंदूरबार | ३५.२ | २५.१ |
| नाशिक | ३०.२ | २४.२ |
| पुणे | २४ | २३ |
| पंढरपूर | २७.२ | २४.९ |
| सातारा | २५.१ | २३.५ |
| सांगली | २५.७ | २३.७ |
| सोलापूर | २७.३ | २५ |
| वर्धा | ३७.५ | २६.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** महत्वाचे निर्णय घेण्यास व्यवसायातील महत्वाचे करार-मदार करण्यास आजचा दिवस चांगला आहे.

**वृषभ :** संततीसौख्य लाभेल. मुलामुलींसंदर्भात एखादी भाग्यकारक घटना घडेल. त्यांचे काही प्रश्न असल्यास ते मार्गी लावाल.

**मिथुन :** आर्थिक लाभाचेदृष्टीने एखादी नवी योजना नजरेसमोर येईल. व्यवसायात नवीन कल्पना अंमलात आणू शकाल. दिवस फारसा अनुकूल नाही.

**कर्क :** जिद्दीच्या जोरावर तुम्ही तुमची आजची कामे पार पाडू शकाल. वाहने जपून व सावधानतेने चालवावीत. प्रवास टाळावेत.

**सिंह :** महत्वाचे निर्णय नकोत. काहींची अध्यात्मिक प्रगती होईल. आज तुम्हाला महत्वाच्या आर्थिक कामांत पत्नीचा सल्ला उपयोगी ठरणार आहे.

**कन्या :** वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. मित्रांचे सहकार्य उत्तम लाभेल. अपेक्षित गाठीभेटी पडतील. उत्साह व उमेद वाढेल. प्रवास सुखकर होतील.

**तुळ :** हाताखालील कर्मचाऱ्यांचे उत्तम सहकार्य लाभेल. काहींची अध्यात्मिक प्रवृत्ती वाढीस लागेल.

**वृश्चिक :** वाहने सावकाश व जपून चालवावीत. तुमची चीडचीड होणार आहे. आरोग्याच्या थोड्याफार तक्रारी जाणवतील.


**धनु :** नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे. मानसिक अस्वास्थता जाणवेल. प्रकृतीकडे लक्ष द्यावयास हवे. प्रवास शक्यतो टाळावेत.

**मकर :** नवीन हितसंबंध निर्माण होतील. अपेक्षित गाठीभेटी पडतील. सध्या आपणाला नातेवाईकांचे सहकार्य मिळणार नाही, हे गृहितच धरावयास हवे.

**कुंभ :** आज पूर्ण दिवस तुम्ही उत्साहाने व उमेदीने कार्यरत राहणार आहात. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायात नवीन बाजारपेठ मिळवू शकाल.

**मीन :** नोकरी-व्यवसायात उत्तम महत्वाचे निर्णय घेण्यास तसेच आगामी काळाचे नियोजनास दिवस अनुकूल आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १००३



### आडवे शब्द

१. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' असे सांगणारा नेता
१०. विषमाच्या विरुद्ध
१२. केस काळे करण्याचे साधन
१३. गाणे गाणारा
१४. पर्ण
१५. लग्नातील नवरा मुलगा
१७. मळलेला
२०. नूतन
२१. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
२५. जमीनजुमला
२७. शिर्डीचे संत
२९. गंध
३०. शारीरिक श्रम, अंगमेहनत
३३. सदोदित
३४. सासरच्या विरुद्ध
३५. भाकरीचे एक धान्य
३६. पंकज
३७. टिंगल
३८. हिंदीत जवळ, इंग्रजीत उत्तीर्ण
३९. कौशल्य
४१. रेशमाचे जाडसर कापड
४२. रखवालदार
४४. तात्पर्य
४५. चांदणी
४७. भेग, चीर
४८. रांग, दर्शनासाठी ओळ
४९. पातक
५०. द्वाड, खोडकर (हिंदी)
५३. बेशुद्ध, चैतन्यहीन
५५. किंचित कडू चव
५६. उत्सवाचे दिवस
५७. भारवाहक
५८. रंग
६१. लहान पोर
६३. सुट्टीचा दिवस
६६. हसू येण्याजोगे
६८. रथ चालविणारा
६९. अधिक श्रेष्ठ, वरचढ
७०. नेता
७१. पांढऱ्या टोपीचे गवत
७२. नवे कोरे
७३. तीव्र ऊन
७४. पोत्याचे कापड

### उभे शब्द

१. स्वेटरचा उबदार धागा
२. मनाचा ओढा
३. मोजणी
४. एक तिखटमिठाची वडी
५. मियांची नकली वेणी
६. धेनु, गोमाता
७. धडधड
८. पुरुषांच्या कपाळावरील चंदनाचा ठिपका
९. ललाट
१०. उंच सखल नसलेले
११. अंत:करण
१६. अरण्यवास
१७. मज्जाव, बंदी
१८. गुरांचे खाद्य
१९. तांदूळ
२२. पुष्कळ
२३. त्याप्रमाणे
२४. महाडचे सुप्रसिद्ध तळे
२५. अखबार
२६. बाज विणण्याचे कापडी पट्टी
२८. मूर्ख
३०. काम, कार्य
३१. लहानसहान
३२. '--- मे हड्डी' एक म्हण
३३. किरकोळ सामान
३५. पावा
३६. मकबरा थडगे
३८. पवित्र
४०. माळ, हार
४३. विपुलता
४५. संतापी
४६. लोखंड घासण्याचे एक हत्यार
४९. शेराचा चौथा भाग
५१. ताणलेल्या दोरीचा आवाज
५२. मावा
५३. आवस, पौर्णिमेच्या विरुद्ध
५४. आश्चर्य
५९. दीपक
६०. निवड न करता एकच
६१. भाताची पानातील सुबक वाढ
६२. घागरा
६४. दुधाचे दही बनविणारे
६५. अखंडता
६६. सोने
६७. प्रतिस्पर्धी
६८. मलई
६९. अव्याहत
७०. मुलाची मुलगी
७१. थंड

### जम्बो शब्दकोडे क्र. १००२ चे उत्तर

आडवे उत्तर : १.मृत्युंजय ४.लाभदायक ७.अवास्तव १०.यमन १२.पसायदान १४.मज १५.रसभरीत १८.कावा १९.वहिवाट २१.नरम २२.सदाचार २३.तीन २४.नानकटाई २५.कलम २७.परवा २८.मेषपात्र ३०.जसा भाव तसा ३२.डमरु ३३.भरीत ३४.मलमल ३६.अवसान ३८.पार ३९.दमणी ४१.जनन ४२.सट ४२अ.कोटर ४४.बायको ४५.गरा ४६.विना ४८.दार ४९.रजनीनाथ ५०.कापूर ५१.तुलसीदास ५४.वार्ता ५५.कलह ५६.नमन ५७.करकरीत ५९.नीरज ६१.पावा ६२.डमडम ६४.वसा ६७.कडकडाट ६८.कदम ६९.रसरशीत

उभे उत्तर : १.मृग २.जय ३.यम ५.भरभर ६.कप ७.अदाकार ८.वानवा ९.वर्तमानपत्र ११.नर १३.साम दाम दंड भेद १४.महिना १६.सनई १७.रीम १९अ.वानवसा २०.टक २२.सल २५.कवायत २६.पौष २७.परतपरत २८. मेरुमणी २९.पालम ३१.वर्ज्य ३५.लघुकोन ३६.अजगर ३७.वनराज ३८.पाट ४०.मस्त ४२.सनाथ ४३.टक्कर ४४.बारदान ४६.विनायक ४७.अतुलनीय ४८.दासी ५२.लहर ५३.समस्त ५४.वातड ५७.कवाड ५८.कडक ६०.जवस ६१.पाक ६३.मद ६५.सार ६६.खंत

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.



## पुणे महानगरपालिकेकडून ४४ शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंचा गौरव

पुणे (दै. संध्या)

■ शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंच्या यशातून नव्या पिढीतील खेळाडूंना प्रेरणा मिळावी - महापौर मंजुषा नागपुरे

पुणे ही क्रीडा परंपरा आणि गुणवंत खेळाडूंची भूमी आहे. शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंनी आपल्या जिद्द, मेहनत आणि उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर पुण्याच्या क्रीडा परंपरेत मानाचा तुरा रोवला आहे. त्यांच्या यशातून नव्या पिढीतील खेळाडूंना प्रेरणा मिळून क्रीडा क्षेत्रात उत्कृष्टतेचा ध्यास घेण्याची नवी ऊर्जा मिळेल. पुणे महानगरपालिका गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि शहरात सक्षम क्रीडा संस्कृती निर्माण करण्यासाठी सदैव कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन महापौर मंजुषा नागपुरे यांनी केले. पुणे महानगरपालिकेच्या वतीने शहरातील शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंचा सन्मान सोहळा आज पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक हॉल येथे उत्साहात पार पडला. या सन्मान सोहळ्यात महापौर नागपुरे बोलत होत्या.

यावेळी उपमहापौर परशुराम वाडेकर, स्थायी समिती सभापती श्रीनाथ भिमाले, क्रीडा समितीचे अध्यक्ष विरोधी पक्षनेते ॲड. निलेश निकम यांच्यासह उपायुक्त डॉ. संतोष टेंगळे, तसेच विविध मान्यवर, क्रीडापटू, प्रशिक्षक, अधिकारी व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले. पुणे महानगरपालिका राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी कटिबद्ध असून, सुधारित क्रीडा धोरणाच्या माध्यमातून गुणवंत खेळाडूंना आवश्यक सुविधा, प्रोत्साहन आणि सन्मान देण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे.

# मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा प्रशासनाची सतर्कता

## ३० जणांची सुटका, २७० हून अधिक नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर

पुणे (दै. संध्या)

■ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री यांनी घेतला परिस्थितीचा आढावा

■ प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश



जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिवसभर सर्व तालुक्यांतील परिस्थितीचा सातत्याने आढावा घेत महसूल, पोलीस, आपत्ती व्यवस्थापन तसेच इतर संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधून बचाव व मदतकार्य प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाची सर्व यंत्रणा २४ तास कार्यरत असून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत माहितीवर विश्वास ठेवावा, अनावश्यक प्रवास टाळावा आणि प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

पुणे जिल्ह्यात ५ व ६ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी दरडी कोसळणे, पूल पाण्याखाली जाणे तसेच रस्ते व रेल्वे वाहतुकीवर परिणाम होण्याच्या घटना घडल्या. प्रादेशिक हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केल्यानंतर जिल्हा प्रशासनाने तत्काळ सर्व यंत्रणा सज्ज करून महसूल, पोलीस, अग्निशमन दल, एनडीआरएफ, एसडीआरएफ तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समन्वयातून युद्धपातळीवर बचाव व मदतकार्य राबविले. या कार्यवाहीत ३० जणांची सुरक्षित सुटका करण्यात आली, तर २७० हून अधिक नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले. दुर्दैवाने मावळ तालुक्यातील पाटण येथे घरावर दरड कोसळून ३ जणांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील २७ महसूल मंडळांमध्ये ६५ मिमीपेक्षा अधिक पाऊस झाला असून मावळ तालुक्यात सर्वाधिक २३७.३ मिमी पर्जन्यमानाची नोंद झाली आहे. मावळ तालुक्यात तळेगाव परिसरात पाण्यात अडकलेल्या कंपनीच्या बसमधील ३० कर्मचाऱ्यांना अग्निशमन दलाने सुरक्षित बाहेर काढले. ताजे गावातील डोंगरपायथ्यावरील सुमारे २५० नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यात आले. मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक परिसर तसेच लोणावळा–कर्जत रेल्वेमार्गावरील दरडी हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून वाहतूक पूर्ववत करण्यासाठी संबंधित यंत्रणा सातत्याने कार्यरत आहेत.

हवेली तालुक्यातील भावडी येथे पाच कुटुंबांतील २२ ते २४ नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. देहू, आळंदी आणि इतर पूरग्रस्त भागांमध्ये नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत पूल व धोकादायक मार्ग तात्पुरते बंद करण्यात आले. आळंदी येथे इंद्रायणी नदीच्या वाढत्या पाणीपातळीमुळे मंदिर परिसर आणि धर्मशाळांमधील भाविकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले.

मुळशी, भोर, वेल्हे, खेड, पुरंदर तसेच इतर तालुक्यांमध्ये दरडी कोसळलेल्या ठिकाणी तातडीने यंत्रणा पाठवून दगड-माती हटविणे, रस्ते खुले करणे, बॅरिकेडिंग करणे आणि धोकादायक भागातील नागरिकांचे स्थलांतर करण्याची कार्यवाही करण्यात आली. अनेक ठिकाणी संभाव्य धोका ओळखून वाहतूक बंद करण्यात आल्याने मोठ्या दुर्घटना टाळण्यात प्रशासनाला यश आले.

पुणे शहरातील सदाशिव पेठेतील धोकादायक इमारत तातडीने रिकामी करण्यात आली. पिंपरी-चिंचवड व शिरूर येथील घटनांमध्येही संबंधित यंत्रणांनी तत्काळ प्रतिसाद देत मदतकार्य सुरू केले असून बेपत्ता व्यक्तींचा शोध सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे पुणे जिल्ह्यातील अतिवृष्टीच्या परिस्थितीचा आढावा घेऊन जिल्हाधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेत आवश्यक त्या सूचना दिल्या. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीही जिल्ह्यातील प्रत्येक घडामोडीची सातत्याने माहिती घेत संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून आवश्यक सूचना दिल्या तसेच पुढील दिवशीही पूर्ण सतर्कता बाळगण्याचे निर्देश दिले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार पुणे महापालिकेची तातडीची कार्यवाही

■ वारकऱ्यांच्या सेवेसाठी महापालिकेच्या जिथे दिंड्या उतरतात त्या १०१ शाळांना रविवारपर्यंत सुट्टी – महापौर मंजुषाताई नागपुरे

पुणे (दैनिक संध्या) : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आळंदी परिसरात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेली पूरस्थिती आणि वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे महानगरपालिकेने तातडीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. वारकऱ्यांच्या निवारा, भोजन व अन्य आवश्यक सुविधांसाठी पुणे महानगरपालिकेच्या जिथे दिंड्या उतरतात त्या १०१ शाळांना उद्यापासून रविवारपर्यंत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे महापौर मंजुषा ताई नागपुरे यांनी दिली. महापौर मंजुषा ताई नागपुरे यांनी सांगितले की, पुणे महानगरपालिकेच्या १०१ शाळांमध्ये वारकऱ्यांच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात येणार असून, शाळांमध्ये आवश्यक त्या सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत. तसेच, १२ जुलैपर्यंत पाणी कपात रद्द करण्यात आली असून, वारकऱ्यांना पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधांचा कोणताही अभाव भासू नये यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. भवानी पेठ येथील सावित्रीबाई फुले शाळा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय परिसरात बसण्याची व्यवस्था उभारण्यात आले असून . आवश्यकतेनुसार इतर शाळाही निवारा केंद्र म्हणून सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. यावेळी महापौर मंजुषा ताई नागपुरे यांनी सांगितले की, “वारकरी हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे मानबिंदू आहेत. त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी पुणे महानगरपालिका पूर्ण क्षमतेने कार्यरत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. वारकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.” पुणे महानगरपालिका, जिल्हा प्रशासन आणि राज्य शासन यांच्यात समन्वय राखून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात असून, नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### सह्याद्रि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये यशस्वी ऑटोलॉगस स्टेम सेल प्रत्यारोपण

पुणे (दैनिक संध्या) : हडपसर येथे राहणारे 46 वर्षीय मेकॅनिकल इंजिनिअर ऋतिक मेहरा यांच्यासाठी जानेवारी 2026 मधील नियमित वार्षिक आरोग्य तपासणी आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. कोणतीही लक्षणे नसताना आणि नेहमीप्रमाणे काम सुरू असतानाच त्यांच्या रक्त तपासणीत हिमोग्लोबिनचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे आढळले. पुढील तपासणीत त्यांना IgA लॅम्बडा (Lambda) मल्टीपल मायलोमा या अस्थिमज्जेतील प्लाझ्मा पेशींमध्ये होणाऱ्या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. IgA लॅम्बडा (Lambda) मल्टीपल मायलोमा हा प्लाझ्मा पेशींचा (Plasma Cells) एक प्रकारचा कर्करोग आहे, ज्यामध्ये शरीरातील असामान्य प्लाझ्मा पेशी लॅम्बडा लाईट चेन (Lambda Light Chain) नावाचे मोनोक्लोनल प्रोटीन जास्त प्रमाणात तयार करतात सामान्यतः आपल्या शरीरातील प्लाझ्मा पेशी संसर्गाशी लढण्यासाठी अँटीबॉडीज बनवतात, परंतु या आजारात त्या निकामी आणि हानिकारक प्रोटीन्स बनवू लागतात. "उपचारांपेक्षा कर्करोगाचे निदान स्वीकारणे माझ्यासाठी अधिक कठीण होते," असे ऋतिक मेहरा यांनी सांगितले. "मी पूर्णपणे सामान्य आयुष्य जगत होतो आणि मला कोणतीही लक्षणे नव्हती. नियमित आरोग्य तपासणीतून अचानक कर्करोग झाल्याचे समजल्याने मोठा धक्का बसला. मात्र माझ्या पत्नीने संपूर्ण काळात मला सकारात्मक राहण्यासाठी प्रोत्साहन दिले. उपचार आणि स्टेम सेल प्रत्यारोपणाची प्रक्रिया माझ्या अपेक्षेपेक्षा खूपच सुरळीत झाली आणि आता मी हळूहळू माझ्या दैनंदिन आयुष्यात परतत आहे."

### आयडीएफसी फर्स्ट बँकेतून आता ईपीएफओचे पीएफ भरणा शक्य

IDFC FIRST Bank

पुणे (दैनिक संध्या) : भारत सरकारच्या श्रम आणि रोजगार मंत्रालयांतर्गत कार्यरत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ)च्या प्लॅटफॉर्मवर आयडीएफसी फर्स्ट बँकेने यशस्वी इंटिग्रेशन पूर्ण करून भविष्य निर्वाह निधी (पीएफ) देयक भरणा सेवा सुरू केली आहे. ईपीएफओने भविष्य निर्वाह निधी देयकांच्या वितरणासाठी आयडीएफसी फर्स्ट बँकेला अधिकृत मान्यता दिली आहे. या नव्या सुविधेमुळे उद्योग-आस्थापनांना ईपीएफओच्या पोर्टलद्वारे थेट पीएफ देयके सुरू करून आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या किरकोळ तसेच कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून ती सुरक्षित आणि अखंड पद्धतीने पूर्ण करता येणार आहेत.

## १९ ते २१ जुलैदरम्यान २४१ वा श्री वरदेंद्र तीर्थ स्वामीजी आराधना महोत्सव

पुणे (दै. संध्या)



सदाशिव पेठ येथील नंजनगूड श्री वरदेंद्र राघवेंद्र स्वामी मठात पूज्य श्री वरदेंद्र तीर्थ स्वामीजी यांच्या 241 व्या आराधना महोत्सवाचे आयोजन 19 ते 21 जुलै 2026 या कालावधीत अत्यंत भक्तिमय, वैदिक आणि धार्मिक वातावरणात करण्यात आले आहे. या पवित्र महोत्सवासाठी महाराष्ट्रासह देशभरातून हजारो भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. हा महोत्सव परमपूज्य 108 श्री सुयतीन्द्र तीर्थ स्वामीजी यांच्या दिव्य आशीर्वादाने तसेच विद्यमान पीठाधीश्वर परमपूज्य 108 डॉ. श्री श्री श्री सुबुधेन्द्र तीर्थ स्वामीजी यांच्या पावन सान्निध्यात संपन्न होणार आहे. महोत्सवाची सुरुवात 18 जुलै रोजी सायंकाळी 5.00 वाजता ध्वजारोहण, प्रार्थना उत्सव, गो-पूजन आणि धान्यपूजनाने होईल. त्यानंतर 19 जुलै रोजी पूर्व आराधना, 20 जुलै रोजी मध्य आराधना आणि 21 जुलै रोजी उत्तर आराधना असे विशेष धार्मिक विधी पार पडतील.

दररोज पहाटे 5.30 वाजता सुप्रभात सेवा, सकाळी 8.00 वाजता फलपंचामृत व अष्टोत्तर पारायण, 10.30 वाजता संस्थान पूजा, हस्तोदक व महामंगळआरती, दुपारी 1.00 वाजता तीर्थप्रसाद, सायंकाळी 5.00 ते 7.00 या वेळेत हरिभजन व आध्यात्मिक प्रवचन, तसेच रात्री 8.00 वाजता उत्सव व अष्टावधान मंगलआरती आयोजित करण्यात येणार आहे. महोत्सवादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचीही रेलचेल असणार आहे. 19 जुलै रोजी बेंगळुरू येथील श्री आनंद तीर्थ यांचे कोलालू वाद्य सादरीकरण, 20 जुलै रोजी पुण्याचे पं. श्री रघुनंदन पानशीकर यांचे दासवाणी सादरीकरण, तर 21 जुलै रोजी श्रीमती नेहा देशपांडे कुलकर्णी यांचे हिंदुस्थानी शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले आहे.

## उपमहापौर परशुराम वाडेकर धावले नागरिकांच्या मदतीला

### नदी सुधार प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष कारणीभूत असल्याचा उपमहापौरांचा गंभीर आरोप

पुणे (दै. संध्या)



गेल्या दोन दिवसांपासून पुणे शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बोपोडी परिसरातील मुळा नदीच्या पाण्याच्या पातळीत झपाट्याने वाढ झाली. परिणामी प्रभाग क्र. ०८ मधील नदीकाठच्या अनेक वस्त्यांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. पूरग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी उपमहापौर परशुराम वाडेकर हे गुडघाभर पाण्यात उतरले होते. नदीपात्रात उद्भवलेल्या या सर्व प्रकाराला नदी सुधार प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष कारणीभूत असल्याचा गंभीर आरोप उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केला आहे.

या विषयी बोलताना उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सांगितले की, मागील दोन दिवस सुरू असलेल्या पावसामुळे निम्मी बोपोडी पाण्याखाली गेली आहे. पुराचा फटका आदर्श नगर, कोटकर लेन, मंत्री रिवेरा, गोयल-शिंदे पार्क, बोपोडी स्मशानभूमी, मुस्लिम कब्रस्तान परिसर, चिखलवाडी आणि पडाळ वसाहत या भागांना बसला.

अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याची वेळ आली. महापालिका प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

पुढे बोलताना वाडेकर यांनी सांगितले की, नदीवर झालेल्या नवीन पूलांचे काम सुरू असताना निर्माण केलेल्या पर्यायी पूलांचे सांगाडे नदीत तसेच आहेत, यामुळे पाणी वाहण्यास अडथळा निर्माण होत असल्याचे नदी सुधार प्रकल्पाचे अधिकारी गोजारे यांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. या बाबत सभागृहात प्रश्न उपस्थित केलेले आहेत तरीही अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. परिणामी नदीला पुर आलेला नसतानाही बोपोडी पाण्याखाली गेली आहे.

परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत परशुराम वाडेकर यांच्यासह माजी उपमहापौर सुनीता वाडेका, आनंद छाजेड, नगरसेविका सपना छाजेड, अविनाश कदम, आप्पासाहेब वाडेकर, अविनाश सपकाळ (उपायुक्त, परिमंडळ क्र. ०२, पुणे महानगरपालिका) तसेच विजय नायकल (सहाय्यक आयुक्त, औंध-बोपोडी क्षेत्रीय कार्यालय) यांनी बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने मदतकार्य, पाणी उपसा, स्वच्छता, आरोग्यविषयक उपाययोजना तसेच आवश्यक ती सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

दरम्यान, बोपोडी परिसरात उद्भवलेल्या परिस्थितीची जाणीव आयुक्त नवल किशोर राम यांना करून देण्यात आली आहे. आयुक्तांनी हा प्रश्न गांभीर्याने घेतला असून उद्या दुपारी यासाठी बैठक बोलावण्यात आल्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सांगितले.

### नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे 'वंदे मातरम्'च्या १५० व्या वर्षपूर्तीनिमित्त

## शालेय विद्यार्थ्यांसाठी समूहगीत गायन स्पर्धेचे आयोजन

पुणे (दै. संध्या)

■ क्रांती दिनी होणार वंदेमातरमचा भव्य जागर




'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्षपूर्तीनिमित्त तसेच ९ ऑगस्ट 'क्रांती दिना'चे औचित्य साधून नागरिक सोशल फाउंडेशनच्या मूल्य शिक्षण विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी 'संपूर्ण वंदे मातरम् समूहगीत गायन स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रभक्तीची भावना विद्यार्थ्यांमध्ये अधिक दृढ व्हावी आणि नवीन पिढीला संपूर्ण 'वंदे मातरम्' गीत पाठ व्हावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे, अशी माहिती नागरिक सोशल फाउंडेशनच्या शीतल गोडबोले यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे विश्वस्त अमेय सप्रे उपस्थित होते. ही स्पर्धा रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत डी. ई. एस. इंग्लिश मीडियम स्कूल येथे होणार आहे.

स्पर्धा इयत्ता पहिली ते चौथी आणि पाचवी ते सातवी अशा दोन गटांत आयोजित करण्यात आली असून प्रत्येक संघात १० विद्यार्थी गायक असणे आवश्यक आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५ ते १० विद्यार्थ्यांचा स्वतंत्र गट ठेवण्यात आला असून त्यांचे परीक्षण स्वतंत्र निकषांनुसार करण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी नावनोंदणीची अंतिम मुदत ३० जुलै २०२६ असून इच्छुक शाळांनी नागरिक सोशल फाउंडेशनच्या www.nagariksocialfoundation.org या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. प्रत्येक गटात प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच तीन उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार असून स्पर्धेनंतर लगेचच पारितोषिक वितरण समारंभही आयोजित करण्यात येणार आहे.

शाळांनी मोठ्या संख्येने या राष्ट्रभक्तीपर उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन नागरिक सोशल फाउंडेशनच्या मूल्य शिक्षण विभागाने केले आहे. स्पर्धेसाठी अत्यंत नाममात्र प्रवेश शुल्क आकारण्यात येणार असून अधिक माहितीसाठी ९४२२०००४६९ किंवा ७७९८९८२०२१ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

## मतदारसंघनिहाय मदत कक्ष स्थापन

पुणे (दै. संध्या)

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमास दि. २० जून २०२६ पासून प्रारंभ झाला असून हा कार्यक्रम सुरळीत व प्रभावीपणे राबविण्यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या मदत कक्षांसाठी समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून मतदारांना आवश्यक माहिती व मार्गदर्शन मिळावे यासाठी ई-मेल आयडी आणि संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत, अशी माहिती उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांनी दिली आहे. ग्रामीण भागातील विधानसभा मतदारसंघ (१९५ ते २०३) जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर, दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर आणि भोर या मतदारसंघांसाठी श्रीमती सुरेखा माने, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ११), जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संपर्कासाठी Toll Free क्रमांक १९५० तसेच sirhelpdeskrural@gmail.com हा ई-मेल उपलब्ध आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र (२०४ ते २०७) मावळ, चिंचवड, पिंपरी आणि भोसरी या मतदारसंघांसाठी श्री. सचिन पवार, उपआयुक्त, निवडणूक विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संपर्क क्रमांक ८८८८००६६६६ आणि sirhelpdeskpcmc@gmail.com हा ई-मेल उपलब्ध आहे. पुणे महानगरपालिका क्षेत्र (२०८ ते २१५) वडगाव शेरी, शिवाजीनगर, कोथरूड, खडकवासला, पर्वती, हडपसर, पुणे कँटोन्मेंट आणि कसबा पेठ या मतदारसंघांसाठी श्रीमती प्राची कचरे, महापालिका सहाय्यक आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# विशेष मुलांच्या आयुष्यात आशेचा किरण ठरत आहे ‘साहस फाउंडेशन’

पुणे (दै. संध्या)



विशेष गरजा असलेल्या मुलांकडे समाजात अनेकदा दयेच्या भावनेने पाहिले जाते. मात्र, योग्य प्रशिक्षण, प्रोत्साहन आणि संधी मिळाल्यास ही मुलेही स्वावलंबी व आत्मविश्वासपूर्ण जीवन जगू शकतात, हा विश्वास प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करणारे साहस फाउंडेशन गेल्या नऊ वर्षांपासून विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करत आहे.

सन २०१७ मध्ये सामाजिक कार्यकर्ते सतीश खराडे यांनी स्थापन केलेली साहस फाउंडेशन ही पूर्णपणे ना-नफा तत्त्वावर कार्य करणारी संस्था असून पुणे व मुंबई परिसरातील शेकडो विशेष मुलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे काम करत आहे. संस्थेचे मुख्य उद्दिष्ट विशेष मुलांना शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि जीवनकौशल्यांच्या माध्यमातून अधिक सक्षम व स्वावलंबी बनविणे हे आहे.

संस्थेची ३५ सदस्यांची समर्पित टीम विशेष मुलांच्या घरी जाऊन त्यांना शारीरिक तंदुरुस्ती, शरीराचा समन्वय, संतुलन, क्रीडा कौशल्ये, दैनंदिन जीवनातील स्वावलंबन तसेच सामाजिक कौशल्यांचा विकास यासाठी नियमित प्रशिक्षण देते. प्रत्येक मुलाने भविष्यात शक्य तितकी स्वतःची कामे स्वतः करण्यास सक्षम व्हावे आणि पालकांवरील अवलंबित्व कमी व्हावे, या उद्देशाने संस्था सातत्याने कार्यरत आहे.

विशेष मुलांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी साहस फाउंडेशनतर्फे ट्रेकिंग, फील्ड ट्रिप, साहसी उपक्रम, क्रीडा स्पर्धा, समूह उपक्रम आणि विविध कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियमित आयोजन केले जाते. सध्या संस्थेत १०० हून अधिक विद्यार्थी नियमित प्रशिक्षण घेत असून ५०० पेक्षा अधिक कुटुंबांना संस्थेने मार्गदर्शन, समुपदेशन आणि विविध प्रकारचा आधार दिला आहे.

या सामाजिक उपक्रमात सहसंचालक मयूर लोणकर, तांत्रिक प्रमुख एकनाथ पाडेकर, सचिव वैभव गायकवाड, विशेष शिक्षिका सोनाली अहिरे, सुचेता पवार तसेच साहस फाउंडेशनची संपूर्ण टीम निस्वार्थ भावनेने योगदान देत आहे.




## सुपे खुर्दच्या दिंडीला तंबूंची भेट

**सासवड (दै. संध्या) :**

पुरंदर तालुक्यातील सुपे खुर्द येथील श्री बाळोबानाथ प्रासादिक दिंडीसाठी सहकारमहर्षी स्व. चंदुकाका जगताप यांच्या स्मरणार्थ माजी आमदार संजय जगताप यांच्या वतीने दिंडीला पाच तंबू भेट देण्यात आले.

सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या हस्ते सुपे खुर्द येथील दिंडीचे प्रतिनिधी संतोष जगताप आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडे हे तंबू सुपुर्द करण्यात आले. याप्रसंगी रविंद्रपंत जगताप, सतीश शिंदे, भाऊसाहेब कापरे आणि दीपक जगताप उपस्थित होते.

# नैसर्गिक आपत्तीमध्ये नागरिकांना तातडीने आवश्यक ती सर्व मदत करावी

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार : प्रशासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सूचनांचे नागरिकांना पालन करण्याचे आवाहन

**बारामती (दै. संध्या) :**



जिल्ह्यात उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना तातडीने आवश्यक ती सर्व मदत करावी अशा सुचना दिल्या आहेत. अतिवृष्टीच्या काळात प्रशासन सज्ज झाले असून नागरिकांनीही प्रशासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी आज विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, पुणे मनपा आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी-चिंचवड मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पीएमआरडीएचे आयुक्त अभिजित चौधरी, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी-चिंचवड शहरचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल, यांच्याकडून जिल्ह्यातील परिस्थितीबाबत आढावा घेतला.

जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे बाधित भागातील नागरिकांना तात्काळ मदत पोहोचवा. गावातील संपर्क तुटल्यास युद्धपातळीवर उपाययोजना करुन पूर्ववत करावे. मानवी जीविताचे संरक्षण हे सर्वोच्च प्राधान्य मानून प्रत्येक निर्णय घ्यावा. नियंत्रण कक्ष 24x7 पूर्ण क्षमतेने कार्यरत ठेवावा व प्रत्येक तासाला परिस्थितीचा आढावा घ्यावा. धोकादायक भागातील नागरिकांचे तातडीने स्थलांतर करून सुरक्षित निवारा, अन्न, पिण्याचे पाणी आणि आरोग्य सुविधा तातडीने उपलब्ध कराव्यात. पूर, भूस्खलन आणि धरण विसर्गाबाबत वेळेवर इशारे एसएमएस, सोशल मीडिया, ग्रामपंचायत व स्थानिक यंत्रणेमार्फत द्यावेत.

कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी मुख्यालय सोडणार नाही. सर्व यंत्रणा सतत सज्ज ठेवाव्यात. एनडीआरएफ, एसडीआरएफ, पोलीस, अग्निशमन दल आणि महसूल यांच्यात समन्वय ठेवून तातडीने बचावकार्य करावे.

बंद रस्ते, पूल आणि घाटांवर कडक बंदोबस्त ठेवून नागरिकांना धोकादायक ठिकाणी जाण्यापासून रोखावे.अफवांवर नियंत्रण ठेवून अधिकृत माहितीच प्रसारित करावी.

मृत्यू, जखमी आणि नुकसानग्रस्त कुटुंबांना शासनाच्या नियमांनुसार तातडीची मदत उपलब्ध करून द्यावी.

वीज, पाणी, आरोग्य आणि दळणवळण सेवा शक्य तितक्या लवकर पूर्ववत करण्यासाठी संबंधित विभागांनी युद्धपातळीवर काम करावे.

प्रत्येक दोन तासांनी परिस्थितीचा अद्ययावत अहवाल शासनाला सादर करावा. जिल्हाधिकारी स्वतः संवेदनशील भागांवर सतत देखरेख ठेवून आवश्यक ते निर्णय तातडीने घ्यावेत; कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही.

वारकऱ्यांची विशेष काळजी घ्यावी.वयोवृद्ध महिला लहान मुले ही सुद्धा वारीमध्ये येणार आहेत त्यामुळे त्यांची विशेष काळजी घ्यावी, माहिती तंत्रज्ञान पार्क (आयटी), औद्योगिक परिसरामध्ये वाहतूक कोंडी होणार नाही, याबाबत पोलिसांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना श्रीमती पवार यांनी दिल्या.

जिल्ह्यात सतत पडत असलेल्या पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीमध्ये वाढ झाल्याने पाण्याचा मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे, नदीवरील पुलावरील वाहतूक बंद करण्यात आलेली आहे.जिल्ह्यातील परिस्थितीचा विचार करता नागरिकांनी नदीपात्राजवळ जाऊ नये किंवा पात्रात उतरू नये, असे आवाहन श्रीमती पवार यांनी केले.

भारतीय हवामान खात्याने पुणे जिल्ह्यासाठी अतिदक्षतेचा इशारा दिला आहे, या पार्श्वभूमीवर प्रशासनाने समन्वय साधून काम करावे, नागरिकांनीही प्रशासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे. कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, संकटाच्या काळात एकजूटीने काम करुया आणि नैसर्गिक संकटावर मात करु या, असे आवाहन उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## ओमकार साई बालसंगोपन केद्रांतील मुलींना खाऊ व शैक्षणिक साहित्याचे वाटप

डोंबिवली (दैनिक संध्या) : जनजागृती सेवा संस्थेचा शैक्षणिक उपक्रम म्हणून डोंबिवली येथील ओमकार साई बालसंगोपन केद्रांतील मुलींना खाऊ व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.यामध्ये प्लास्टिक फोल्डर,पेन, पेन्सिल,खोड रबर,शार्पनर, पेन्सिल,फुलस्केप पेपर, प्रत्येकी अर्धा डझन फुल साईज वह्या,लेडीज रुमाल,वॉटर बॅग अशा स्वरूपाचे शैक्षणिक साहित्य संस्थेचे पदाधिकारी आत्माराम नाटेकर,सह खजिनदार श्रुती सतीश उरणकर, चंद्रकला मानकर, संस्थेचे जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे, लोकसेवा समितीचे सचिव चारुदत्त राणे यांच्या हस्ते देण्यात आले.संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी प्रास्ताविक केले.या उपक्रमासाठी लोकसेवा समितीचे सहकार्य लाभले. यावेळी कार्यकारिणी सदस्य आत्माराम नाटेकर आणि जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे यांनी मनोगत व्यक्त केले.उपक्रम संकल्पना व विशेष सहकार्य जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे यांचे लाभले.ओमकार साई बालसंगोपन केंद्राच्या अध्यक्षा सुविधा दांडेकर यांनी संगोपन केंद्राच्या कार्याची माहिती दिली.

## क्रेझी क्रेटोसने क्राफ्टन इंडिया रायझिंग स्टार इनव्हिटेशनल 2026 चे विजेतेपद पटकावले




पुणे (दैनिक संध्या) : रायझिंग स्टार रोहित "क्रॅटोस" सक्सेना च्या नेतृत्वाखालील 'क्रेझी क्रॅटोस' संघाने क्राफ्टन इंडिया ई-स्पोर्ट्स रायझिंग स्टार्स प्रोग्राम मधील खेळाडूंसाठी खास आयोजित केलेल्या, भारतातील पहिल्या बीजीएमआय इन्व्हिटेशनल स्पर्धेत 'क्राफ्टन इंडिया रायझिंग स्टार इन्विटेशनल 2026' मध्ये विजेतेपद पटकावले. तीन दिवस चाललेल्या आणि एकूण 18 सामन्यांमध्ये रंगलेल्या चुरशीच्या स्पर्धेनंतर क्रेझी क्रॅटोस ने 193 गुण आणि तीन विनर विनर चिकन डिनर्स (डब्ल्यूडब्ल्यूसीडी) मिळवत विजेतेपद मिळवले. जस्टीज जेस्टर्स संघाने 166 गुणांसह उपविजेतेपद मिळवले, तर मोस्ट वॉन्टेड संघाने 146 गुण आणि दोन डब्ल्यूडब्ल्यूसीडी च्या जोरावर तिसरे स्थान पटकावले. या उल्लेखनीय कामगिरीत आणखी भर घालत, संपूर्ण स्पर्धेदरम्यान आपल्या संघाचे सातत्यपूर्ण आणि प्रभावी नेतृत्व केल्याबद्दल रोहित "क्रॅटोस" सक्सेना यांना स्पर्धेतील 'मोस्ट व्हॅल्युएबल प्लेअर (एमव्हीपी)' आणि 'बेस्ट रायझिंग स्टार' हे दोन्ही मानाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. 3 ते 5 जुलैदरम्यान आयोजित या तीन दिवसीय स्पर्धेत 16 रायझिंग स्टार्सनी प्रत्येकी पाच सदस्यांच्या आपल्या संघांचे नेतृत्व केले. ₹ 5 लाखांच्या एकूण बक्षीस रकमेसाठी झालेल्या या स्पर्धेतील सर्व सामने क्राफ्टन इंडिया ईस्पोर्ट्स च्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर थेट प्रक्षेपित करण्यात आले.

## रामायणमधील रामाच्या फर्स्ट लूकमागील दागिन्यांचे अनावरण



मुंबई (दैनिक संध्या) : भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात महत्त्वाकांक्षी पौराणिक चित्रपटांपैकी एक असलेल्या रामायणमध्ये भगवान रामाच्या भूमिकेत दिसणाऱ्या रणबीर कपूरचा पहिला लूक जगासमोर येत असताना, पडद्यामागे कला, परंपरा आणि उत्कृष्ट कारागिरीची एक विलक्षण कहाणी उलगडत आहे. या भव्य सिनेमॅटिक प्रकल्पाचे अधिकृत ज्वेलरी भागीदार असलेल्या ट्राइब अम्रपालीने चित्रपटातील पात्रांसाठी आकर्षक आणि बारकाईने तयार केलेले दागिने साकारले आहेत. शतकानुशतके चालत आलेल्या पुराणकथा, प्रतीकात्मकता आणि भारतीय हस्तकलेचे आधुनिक पिढीसाठी दृश्य भाषेत रूपांतर करण्याचे कार्य या दागिन्यांमधून करण्यात आले आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित आणि आयमॅक्स साठी चित्रित करण्यात आलेला रामायण हा भारतातील सर्वाधिक पूजनीय महाकाव्यांपैकी एकाचा भव्य सिनेमॅटिक पुनर्कथन आहे. हा चित्रपट दिवाळी २०२६ आणि २०२७ मध्ये जागतिक स्तरावर प्रदर्शित होणार आहे. सर्वकालीन महान महाकाव्यांपैकी एकापासून प्रेरणा घेत, नितेश तिवारी यांचे रामायण त्यातील कालातीत भावना आणि भव्यता एका विशाल सिनेमॅटिक स्वरूपात पुन्हा साकारण्याचा प्रयत्न करत आहे. चित्रपटात रणबीर कपूर भगवान राम, साई पल्लवी सीता, तर यश प्रभावशाली रावणाच्या भूमिकेत दिसणार आहेत. सनी देओल हनुमानाची भूमिका साकारणार असून, रवि दुबे लक्ष्मणाच्या भूमिकेत आहेत. ट्राइब अम्रपालीसाठी हे सहकार्य केवळ दागिन्यांच्या डिझाइनपुरते मर्यादित नाही; तर ते एका अमूल्य सांस्कृतिक वारशाला वाहिलेली आदरांजली आहे. १८ महिन्यांहून अधिक काळ, तरंग अरोरा यांच्या सर्जनशील नेतृत्वाखाली आणि चित्रपटाच्या क्रिएटिव्ह टीमच्या निकट सहकार्याने, ब्रँडच्या डिझाइन टीमने पुराणकथा, प्राचीन भारतीय अलंकारकला, मंदिरकला, शिल्पकला आणि प्रतीकात्मक कथांचा सखोल अभ्यास केला. याच्या आधारे रामायणच्या विश्वाशी सुसंगत आणि आधुनिक सिनेमाच्या भव्यतेला साजेशी अशी दागिन्यांची स्वतंत्र दृश्यभाषा विकसित करण्यात आली.

## युएई चलनाच्या आमिषाने फसवणूक करणाऱ्या दोघांना अटक

**मुंबई (दै. संध्या) :**

संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथील दिरहम चलन कमी किमतीत उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याच्या प्रकरणी विक्रोळी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने दोघा आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून १५ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली असून, या गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ जुलै २०२६ रोजी तीन इसमांनी फिर्यादी यांच्याशी संपर्क साधून यूएईचे दिरहम चलन कमी दरात उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवले. आरोपींनी साडेसहा लाख रुपयांच्या बदल्यात १६०० दिरहम देण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार, फिर्यादींना विक्रोळी पूर्व येथील विक्रोळी रेल्वे स्थानकाजवळील आयसीआयसीआय बँक आणि डॉमिनोज परिसरात बोलावण्यात आले. तेथे आरोपींनी फिर्यादींकडून १५ हजार रुपये घेतले आणि दिरहमचे चलन न देता घटनास्थळावरून पसार होऊन फसवणूक केली. या प्रकरणी विक्रोळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास सुरू केला. पोलीस उपनिरीक्षक विकास चव्हाण, प्रशांत मेसे, पोलीस शिपाई संजय मोटे, मंगेश दंडकवाड, योगेश उंडरे, धनवडे, कांगणे तसेच पोलीस हवालदार काटकर यांना गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस

**■ १५ हजारांची रोकड जप्त**



निरीक्षक विक्रांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचण्यात आला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी खबीर मुंशी सुमन (वय ३६, रा. उत्तर दिल्ली, सध्या कल्याण पूर्व येथे वास्तव्यास) आणि रहीम तसलीम कुरेशी (वय ३२, रा. अलीगड, उत्तर प्रदेश) या दोघांना मुद्देमालासह ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपींकडून ५०० रुपयांच्या ३० नोटा, अशी एकूण १५ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे. फिर्यादीला गुन्ह्याची प्रत देण्यात आली असून, पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला आहे.

आरोपींचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विकास चव्हाण करीत असून, या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा शोध पोलीस घेत आहेत.

## आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ पुणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधा - महापौर मंजुषा नागपुरे

**संततधार पावसाच्या पार्श्वभूमीवर महापौर मंजुषा नागपुरे यांनी घेतला आपत्ती व्यवस्थापन कक्षाचा आढावा**



**महत्त्वाचे आपत्कालीन संपर्क क्रमांक**
पोलीस : १०० / ११२
रुग्णवाहिका : १०२ / १०८
अग्निशमन विभाग : १०१
जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्ष, पुणे : १०७७ / ०२०-२६१२३३७१
पुणे महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभाग : ०२०-२५५०१२६९ / ०२०-२५५०६८००

**पुणे (दै. संध्या) :**

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे पुणे शहरातील जनजीवनावर परिणाम झाला असून, शहरातून वाहणाऱ्या मुळा-मुठा नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी आज महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला भेट देऊन शहरातील सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी शहरातील विविध भागांतील पर्जन्यमान, पाणी साचलेल्या ठिकाणांची स्थिती, मुळा- मुठा नदीपात्रांतील पाणीपातळी, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी कार्यरत असलेल्या यंत्रणेची तयारी तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली.

महापौर मंजुषा नागपुरे यांनी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक गतिमान, समन्वयपूर्ण व परिणामकारक पद्धतीने कार्यरत ठेवण्याच्या सूचना देत, संभाव्य आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने प्रतिसाद देण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले. पूरप्रवण क्षेत्रे, नदीकाठचा परिसर, पाणी साचणारे भाग तसेच वाहतूक व्यवस्थेवर सातत्याने लक्ष ठेवून सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयातून आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले.

तसेच, हवामान विभागाकडून प्राप्त होणाऱ्या इशाऱ्यांच्या अनुषंगाने परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवावे, आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री व संसाधने उपलब्ध ठेवावीत, तसेच नागरिकांना वेळोवेळी अधिकृत माहिती उपलब्ध करून द्यावी, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

पुणे महानगरपालिकेची आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून कार्यरत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक व तातडीच्या उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

संततधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे. नदीकाठच्या परिसरात तसेच पाणी साचलेल्या ठिकाणी अनावश्यक वावर टाळावा. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ पुणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधून प्रशासनाला सहकार्य करावे. पुणे महानगरपालिकेची यंत्रणा नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पूर्णतः सज्ज असून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

— मंजुषा नागपुरे, महापौर, पुणे महानगरपालिका


## जाहीर दरपत्रक सूचना

विषय : बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ (शिपाई) पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्थांकडून दरपत्रक मागविण्याबाबत

नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे या कार्यालयाकरिता १ (एक) शिपाई, पुरवठा आदेश दिल्याच्या दिनांकापासून ११ महिन्यांच्या कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणाऱ्या नोंदणीकृत व अनुभवी संस्थांकडून द्विलिफाफा बंद पद्धतीने दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | निविदेचा तपशील | उमेदवार संख्या | कालावधी | अंदाजित खर्च | इसारा रक्कम (EMD) | निविदा फॉर्म फी | सुरक्षा ठेव (Security deposit) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | शिपाई वर्गीय उमेदवारांचे मनुष्यबळ | ०१ | ११ महिने | ३७००००/- | ५०००/- | ५००/- | १०% खर्चाच्या |

सदर प्रकरणी दरपत्रक प्रपत्राचा विहित नमुना या कार्यालयात दिनांक ०७/०७/२०२६ ते दि.१३/०७/२०२६ या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. तरी इच्छुक अधिकृत कुशल व अकुशल मनुष्यबळ पुरवठा ठेकेदार तसेच मनुष्यबळ पुरवठा संस्था यांनी सदरील निविदा प्रपत्र भरून दिनांक १३/०७/२०२६ सायं. ५.०० वाजेपर्यंत व्दिलिफाफा बंद पध्दतीमध्ये नगरपालिका प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

शिक्का

सही/-
(चंद्रकांत खोसे)
सह आयुक्त नगरपालिका प्रशासन शाखा पुणे विभाग, पुणे

विमाका/पुणे/जाहि./७१/२०२६-२७

## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष - पाणीपुरवठा विभाग
निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. ०७/०७/२०२६ १४:०० दुपारी ते १६/०७/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. ०७/०७/२०२६ १४:०० दुपारी ते १६/०७/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : १७/०७/२०२६ १५:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_SUPPLY/2026/167 | पाणीपुरवठा | पुणे महानगरपालिकेचे एस.एन.डी.टी. विभागाकडील विविध फ्लोमीटर व RTUची देखभाल दुरूस्तीची कामे करणे. | रू. १३५९/- | रू. २१०७६२०/- | रू. २१०७६/- | १२ | प्रियंका राजेंद्र चौधरी ७४४७४७२७०२ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
सचिन कानिफनाथ दिवसे
कार्यकारी अभियंता
बंडगार्डन पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्रमांक : २/३१९ दि. ०६/०७/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गांव निरगुडे, ता. जुन्नर, जि. पुणे व आसपासचे परिसरातील लोकांना आमचे अशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खाली परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री. प्रकाश किसन राऊत यांचे मालकी ताबेवहिवाटीची मिळकत असून सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार हा आमचे आशिल मुजफ्फर नादिरखान इनामदार, रा. प्लॉट नं. १०९, आशियाना २०००, रोड नं. १४ के, शंकर मंदिरजवळ, स.नं. ३३/२, टिंगरे नगर, विश्रांतवाडी, पुणे शहर, ए.आय.एफ. स्टेशन, पुणे, महाराष्ट्र ४११०३२ यांनी नोटीस मिळकतीचे जमीन मालक श्री. प्रकाश किसन राऊत यांचेसोबत करण्याचे ठरविलेले आहे. तसेच सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असलेबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही बक्षीस, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी-बांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क, हद्दी संदर्भात वाद, चतुः सिमांबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंदु कायद्याप्रमाणे अथवा प्रचलीत प्रथेप्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरुध्द कब्जा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीवपुर्वक सोडून दिलेली आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. व पं. स. जुन्नर, जि. प. पुणे पैकी ग्रामपंचायत निरगुडेचे हद्दीतील खाते क्र. २६८ मिळकत.

| ग. नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. | चतुः सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ५०६ | ००.५७ | ००.९२ | रस्ता | अमर सुभाष जाधव यांची मिळकत | रस्ता | तुकाराम गोपाळा राऊत यांची मिळकत |

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत त्यातील लाकूड फाटा, माती, दगड, धोंडा इत्यादी तदंगभूत वस्तुसहित तसेच सदर जागेमध्ये जाण्या-येण्याचे व वहिवाटीचे सर्व हक्क व अधिकारसुध्दा दरोबस्त मिळकत.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. ०४/०७/२०२६

सही/-
गुलजारखान अब्दुल्लाखान पठाण
ॲडव्होकेट
बी. कॉम. एल. एल. बी.
ऑफीस :- राहील कॉम्प्लेक्स, ऑफीस नं. २०४, दुसरा मजला, नेहरुबाजार, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०२,
मोबा. ९९७००८००८०

# संततधार पावसाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेची यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत

## महापौर आणि आयुक्त यांचे परिस्थितीवर बारकाईने लक्ष : सर्व विभागांना सतर्क राहण्याचे निर्देश

पिंपरी (दै. संध्या)



शहरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सर्व यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत असून महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी संपूर्ण परिस्थितीवर सातत्याने बारकाईने लक्ष ठेवून आहेत. सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करत कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीस तात्काळ प्रतिसाद देण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागांना दिले असून महापालिकेची आपत्कालीन यंत्रणा परिस्थिती हाताळण्यासाठी कार्यरत आहे. पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांच्या पाणीपातळीत झालेली वाढ आणि नदीकाठच्या परिसरातील पूरस्थिती लक्षात घेता संभाव्य धोकादायक भागातील नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्याची कार्यवाही तातडीने हाती घेण्यात आली आहे. आंबेडकर कॉलनी, भाटनागर आणि रिव्हर रोड परिसरातील नागरिकांना साबळे प्राथमिक शाळा तसेच महर्षि वाल्मिकी आश्रम येथे सुरक्षितरित्या स्थलांतरित करण्यात आले आहे. तसेच फुगेवाडी आणि कासारवाडी येथील नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनाही सुरक्षित स्थळी हलविण्याची कार्यवाही सुरू आहे. मोरया गोसावी मंदिर तसेच केशवनगर परिसरात स्थलांतरित नागरिकांसाठी निवारा, भोजन आणि इतर मूलभूत सोयी सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. मुळानगर येथे महापालिकेचे विशेष आपत्कालीन पथक तैनात करण्यात आले असून तेथील परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. याशिवाय, पूरबाधित नागरिकांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पावसामुळे घरांमध्ये शिरलेल्या पाण्याचा तात्काळ निचरा करण्यासाठी महापालिकेची पथके घटनास्थळी दाखल झाली आहेत. गावडे कॉलनी परिसरात साचलेल्या पाण्याचा युद्धपातळीवर उपसा सुरू असून तानाजीनगर परिसरातही जलनिस्सारणाची कामे वेगाने सुरू आहेत. चिखली येथील डिफेन्स कॉलनी, साई शिव कॉर्नर परिसरात पाणी शिरल्याची माहिती मिळताच महापालिकेची यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल होऊन आवश्यक उपाययोजना करत आहे. आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी जेसीबी, जलउपसा पंप तसेच आवश्यक यंत्रसामग्री तैनात करण्यात आली आहे. सर्व क्षेत्रीय कार्यालयांना स्थानिक परिस्थितीनुसार तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांवर पाणी साचू नये यासाठी पावसाच्या पाण्याचा तात्काळ निचरा करण्याचे काम सुरू असून संबंधित विभागांकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. मुसळधार पावसामुळे झाडे पडण्याच्या घटनांवर त्वरित प्रतिसाद देण्यासाठी महापालिकेची सर्व पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी झाडे हटविणे, रस्ते मोकळे करणे आणि आवश्यक ती उपाययोजना तातडीने करण्याचे निर्देश देखील देण्यात आले आहेत. तरी नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता महापालिकेच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे, नदीकाठच्या तसेच पूरग्रस्त भागात जाणे टाळावे आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ महापालिकेशी संपर्क साधावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### आपत्कालीन क्रमांक

पोलीस – १००/११२
रुग्णवाहिका – १०२/१०८
अग्निशमन – १०१
महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्ष – ०२० – ६७३३११११

## पूरस्थितीत अडकलेल्या गर्भवती महिलेची अग्निशमन विभागाकडून सुखरूप सुटका

सकाळी सुमारे ७.०० वाजता किवळे गावठाण येथील संभाजी महाराज चौक परिसरातील गंगोत्री निवास येथे आंचल मोहिते ही गर्भवती महिला पूरस्थितीत अडकल्याची माहिती महापालिकेच्या अग्निशमन विभागास प्राप्त झाली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व गर्भवती महिलेला सुरक्षितरीत्या बाहेर काढून सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात आले. संपूर्ण बचावकार्य वेगाने आणि सुरक्षितपणे पार पाडण्यात आले.

शहरात सुरू असलेल्या संततधार पावसाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेची संपूर्ण यंत्रणा २४ तास कार्यरत असून प्रत्येक परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. नदीकाठच्या तसेच सखल भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत आवश्यक त्या ठिकाणी तातडीने स्थलांतर, जलउपसा, बचाव आणि मदतकार्य सुरू करण्यात आले आहे. सर्व क्षेत्रीय कार्यालये, आपत्कालीन पथके आणि संबंधित विभागांना सतर्क राहून कोणत्याही घटनेला तात्काळ प्रतिसाद देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता महापालिकेच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे आणि आवश्यक असल्यास प्रशासनाशी त्वरित संपर्क साधावा.

**- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

संततधार पावसाच्या पार्श्वभूमीवर महत्वाच्या कामांशिवाय शक्यतो नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत घाबरून न जाता तात्काळ आपत्कालीन संपर्क क्रमांकांवर संपर्क करावा. पूरप्रवण आणि नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने महापालिकेच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या संरक्षणासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना महापालिकेमार्फत केल्या जात असून स्थलांतरित नागरिकांसाठी निवारा, भोजन आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांची सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता असून महापालिका प्रशासन प्रत्येक घटनेवर बारकाईने लक्ष ठेऊन आहे.

**- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## थोडक्यात पण महत्वाचे...




### दत्तवाडी-आकुर्डीतील अनेक घरांमध्ये पाणी शिरले; नगरसेवक प्रमोद कुटे 'ऑनफिल्ड'

पिंपरी (दैनिक संध्या) : अप्पूघर, कॅम्प एज्युकेशन कॉलेज परिसरातील पावसाचे पाणी आकुर्डी परिसरात आल्याने अनेक घरांमध्ये पाणी शिरले आहे. नगरसेवक प्रमोद कुटे भर पावसात अधिकाऱ्यांबरोबर 'ऑनफिल्ड' उतरले असून त्यांची टीम नागरिकांना मदत करीत आहेत.पावसाचे पाणी शिरलेल्या नागरीकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर केले जात आहे. पिंपरी-चिंचवड शहर परिसरात शनिवारपासून पावसाची संततधार सुरू आहे. रविवारी पावसाचा जोर वाढला. मध्यरात्रीपासून जोरदार पाऊस कोसळत आहे. शहराच्या सर्वच भागात पावसाने धुमाकूळ घातला आहे. अप्पूघर, कॅम्प एज्युकेशन कॉलेज परिसरातील पावसाचे पाणी आकुर्डी भागात आले आहे. पाण्याचा लोढा वाढल्याने आकुर्डीतील दत्तवाडी, क्रांतीनगर, साई मंदिर परिसर, अडसूळ गल्ली, रुपेश कॉलनी,दत्तवाडी, जैन मंदिर परिसरात पाणी साचले आहे. नगरसेवक प्रमोद कुटे, अ क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे हे आकुर्डी परिसरातील परिस्थितीवर नियंत्रण ठेऊन आहेत. पाणी शिरलेल्या नागरिकांना घरातून सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात येत आहे. नगरसेवक प्रमोद कुटे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व कार्यकर्ते नागरिकांच्या मदतीला धावून जात आहेत. आपत्तीत नागरिकांना दिलासा देण्यात येत आहे. 'रेड अलर्ट' देण्यात आला आहे. जोरदार पाऊस पडत आहे. त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे.आकुर्डी परिसरातील नागरिकांनी काही अडचण असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन नगरसेवक प्रमोद कुटे यांनी केले आहे.



### मोरया गोसावी मंदिर पाण्याखाली

पिंपरी (दैनिक संध्या) : कालपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पवना नदीला पूर आला असून चिंचवड गावातील ऐतिहासिक व श्रद्धास्थान असलेले मोरया गोसावी मंदिर पाण्याखाली गेले आहे. नदीच्या पाण्याची पातळी झपाट्याने वाढल्याने मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले असून संपूर्ण परिसर जलमय झाला आहे. पूरस्थितीमुळे मंदिर परिसरातील हालचालींवर मर्यादा आणण्यात आल्या असून प्रशासनाने नागरिकांना नदीकाठच्या भागात गर्दी न करण्याचे आवाहन केले आहे. मंदिर परिसराचे दृश्य पाहण्यासाठी भाविक व नागरिक मोठ्या संख्येने येत असल्याने पोलिस व प्रशासनाकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड शहरात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे अनेक सखल भागांत पाणी साचले असून पवना आणि इंद्रायणी नद्यांच्या पाण्याची पातळी धोक्याच्या दिशेने वाढत आहे. प्रशासनाकडून नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून आवश्यक त्या ठिकाणी स्थलांतराची उपाययोजना करण्यात येत आहे.

### धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस

■ पवना धरण ४५.८१ टक्के भरले

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. आज (दि. ६ जुलै) दुपारी १२ वाजेपर्यंत पवना धरण ४५.८१ टक्के भरले असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. धरण परिसरात संततधार पाऊस सुरू असल्याने धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. परिणामी पवना नदी दुथडी भरून वाहत असून नदीकाठच्या भागांमध्ये सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, जोरदार पावसामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक रस्त्यांवर पाणी साचले असून काही ठिकाणी वाहतूक बंद करण्यात आली आहे. नदी आणि नाल्यांच्या पाण्याची पातळी वाढल्याने अनेक भागांमध्ये पाणी शिरल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांनी अनावश्यक घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पूरबाधित भागातील १८८० व्यक्तींचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर

पिंपरी (दै. संध्या)

■ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवारा केंद्रामध्ये भोजन, आरोग्यासह मूलभूत सुविधा उपलब्ध

■ आपत्ती नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत



**'अ' क्षेत्रीय कार्यालय**
– ३०० नागरिक
**'ब' क्षेत्रीय कार्यालय**
– ६३० नागरिक
**'ड' क्षेत्रीय कार्यालय**
– ९५० नागरिक
**'ह' क्षेत्रीय कार्यालय**
– २१० नागरिक

अतिवृष्टीमुळे पिंपरी चिंचवड शहरात पूरस्थिती उद्भवल्यानंतर आज दुपारी १२ वाजेपर्यंत विविध बाधित भागांतील १८८० व्यक्तींचे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आपत्कालीन यंत्रणेकडून सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. पूरबाधितांसाठी महापालिकेने विविध ठिकाणी निवारा केंद्रे तयार केली असून तेथे भोजन, आरोग्यासह आवश्यक सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच महापालिकेचा आपत्ती नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वित ठेवण्यात आला आहे, अशी माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे पिंपरी चिंचवड शहरातून वाहणाऱ्या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत असल्याने कोणतीही जीवित अथवा वित्तीय हानी होऊ नये, यासाठी महापालिकेने नदीकाठच्या नागरिकांना तात्काळ सुरक्षित स्थळी हलवले आहे. आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनीह शहरातील पूरग्रस्त परिस्थितीचा आढावा घेताना पावसाचा जोर वाढत असताना शहरातून वाहणाऱ्या नद्यांच्या पाण्याची धोक्याची पातळी लक्षात घेऊन त्या भागातील नागरिकांना ध्वनीक्षेपकाद्वारे पूर्वसूचना देऊन पूरबाधितांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे. कोणत्याही परिस्थितीत अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

पूर निवारा केंद्रांच्या ठिकाणी वैद्यकीय सुविधेसह पथके नेमली आहेत. त्यांनी पूरबाधितांची आरोग्य तपासणी करून आवश्यक प्राथमिक उपचार करावेत. भोजन व्यवस्था, पिण्याचे पाणी व इतर मूलभूत सोयीसुविधांची कमतरता राहणार नाही, याची काळजी संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी, अशा सूचनादेखील त्यांनी दिल्या आहेत. तसेच कोणतीही आपत्कालीन परिस्थिती लक्षात आल्यास महापालिकेच्या मुख्य नियंत्रण कक्ष क्रमांक ०२०-६७३३११११ / ०२०-२८३३११११ किंवा अग्निशमन विभागाच्या ७०३०९०८९९१ या क्रमांकावर मदतीसाठी संपर्क करावा, असे आवाहन आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी यावेळी केले.

पिंपरी चिंचवड शहरातील नदीपात्रापासून जवळ असणाऱ्या 'अ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील भाटनगर परिसर, 'ब' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील लेबर कॅम्प, किवळे, केशवनगर, जाधव घाट, काळेवाडी, 'ड' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पिंपळे निलख पंचशील नगर, 'इ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील रामनगर, बोपखेल, 'ग' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील संजय गांधी नगर, 'ह' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पिंपळे गुरव, लक्ष्मीनगर या भागांत पुराचे पाणी शिरण्याचा धोका जास्त आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या भागांवर लक्ष केंद्रित केले आहे.



## इंद्रायणी नदी धोक्याच्या पातळीवर; २५० हून अधिक नागरिक पाण्यात अडकले

पिंपरी (दै. संध्या)

परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली असून नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे आळंदीतील अनेक सखल भागांमध्ये पाणी शिरल्याने २५० पेक्षा अधिक नागरिक अडकून पडल्याची माहिती समोर आली आहे. परिस्थितीची गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस, अग्निशमन दल तसेच आपत्ती व्यवस्थापन पथकांनी तातडीने बचावकार्य सुरू केले आहे. अडकलेल्या नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून अनेकांची यशस्वीरित्या सुटका करण्यात आली आहे. प्रशासनाकडून नदीकाठच्या आणि सखल भागातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून आवश्यक नसल्यास घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. बचाव पथके परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व यंत्रणा सज्ज आहेत. मुसळधार पाऊस कायम असल्याने इंद्रायणी नदीच्या पाणीपातळीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## चिखली डिफेन्स कॉलनीतील १०० कुटुंबांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने चिखली डिफेन्स कॉलनी परिसरातील अंदाजे १०० कुटुंबांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले आहे. या कुटुंबांना चिखली गावठाण येथील महापालिका शाळेत हलविण्यात आले असून त्यांच्या निवासाची योग्य व्यवस्था करण्यात आली आहे. स्थलांतरित नागरिकांसाठी वैद्यकीय सेवा, भोजन तसेच इतर आवश्यक सुविधांची उपलब्धता प्रशासनाकडून करण्यात आली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत संबंधित यंत्रणा परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. दरम्यान, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे तसेच आवश्यक असल्यास तात्काळ मदत व संपर्क क्रमांकांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मोशीत पावसाळ्यात व्हायरल फिव्हरचा फैलाव; डेंग्यू-गॅस्ट्रोचा धोका वाढला



सध्या टायफॉइड, गॅस्ट्रो आणि व्हायरल रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. ताप तीन दिवसांपेक्षा जास्त काळ टिकून राहत असेल, अशा वेळी घरगुती उपायांवर वेळ न घालवता डॉक्टरांचा सल्ला घेऊन रक्ताची तपासणी करून घ्यावी. वारंवार होणारी पोटदुखी, अंगदुखी यासारख्या लक्षणांकडेही दुर्लक्ष करू नये. योग्य आहार, व्यायाम यावर भर द्यावा. बाहेरचे, उघड्यावरील अन्न पदार्थ खाणे टाळावे.

**- डॉ. भाग्यश्री लहाने-मुंडे, एमडी मेडिसिन**

मोशी (दै. संध्या)

पावसाळा सुरू झाला की वातावरणात बदल होऊन आजारांचे प्रमाण वाढू लागते. सध्या मान्सूनच्या सुरुवातीलाच ठिकठिकाणी व्हायरल फिव्हर (ताप) आणि सर्दी-खोकल्याचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. वातावरणातील सततच्या चढ-उतारामुळे हवेतील आर्द्रता वाढते, ज्यामुळे विषाणूंचा प्रसार वेगाने होतो. यंदा पावसाळ्याच्या सुरुवातीला व्हायरल फिव्हसह दूषित पाण्यामुळे होणाऱ्या टायफॉइड आणि गॅस्ट्रोएन्टेरायटिस (गॅस्ट्रो) च्या रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

पहिल्या पावसामुळे पाणी दूषित होण्याचे प्रमाण वाढले असून, यामुळे जुलाब, उलट्या, पोटदुखी आणि डिहायड्रेशनच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे. ताप आल्यास तो सामान्य व्हायरल फिव्हर आहे की डेंग्यू, हे ओळखणे गरजेचे आहे. जर ताप दोन-तीन दिवसांपेक्षा जास्त काळ राहिला, अंगावर पुरळ आले, तीव्र ताप असेल आणि डोळ्यांच्या पापण्यांवर जड होऊन दुखत असेल, तर हे डेंग्यूचे लक्षण असू शकते. डेंग्यूमध्ये प्लेटलेट्स कमी होणे आणि तोंडाला कोरड पडणे ही देखील लक्षणे जाणवतात. अशा वेळी घरगुती उपायांवर अवलंबून न राहता तातडीने रक्ताची तपासणी करणे आवश्यक आहे. शहरामध्ये पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचते. या साचलेल्या पाण्यातून उघड्या पायाने चालल्यास लेप्टोस्पायरोसिस या गंभीर आजाराचा धोका निर्माण होतो. साचलेल्या पाण्यात उंदरांच्या मुत्राद्वारे 'लेप्टोस्पायरा' नावाचे जंतू पसरतात. जर पायाला आधीच एखादी जखम असेल आणि अशा पाण्यातून चालल्यास हे जंतू शरीरात प्रवेश करतात. यामुळे ताप, अंगावर पुरळ आणि पायांमध्ये तीव्र वेदना सुरू होतात.

# नागरिकांच्या मदतीला धावले भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे

### रहाटणीत पूर परिस्थिती

पिंपरी (दै. संध्या)





गेल्या काही दिवसांपासून शहरात सुरू असलेल्या संततधार मुसळधार पावसामुळे पवना नदीच्या पाणी पातळीत प्रचंड वाढ झाली आहे. या पूर परिस्थितीमुळे रहाटणी परिसरातील ऐतिहासिक राम मंदिरात अचानक नदीचे पाणी शिरले. पाणी वेगाने वाढल्यामुळे मंदिराच्या परिसरात आणि आतमध्ये अनेक नागरिक अडकल्याची धक्कादायक घटना समोर आली. हे वृत्त समजताच स्थानिक नगरसेवक तथा भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी कोणतीही वाट न पाहता तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पूर परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करत शत्रुघ्न काटे यांनी तात्काळ महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन पथकाला (Emergency Disaster Team) आणि अग्निशामक दलाला पाचारण केले. पाणी पातळी सातत्याने वाढत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी स्वतः उपस्थित राहून बचाव कार्यास सुरुवात केली.

शत्रुघ्न काटे यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्कालीन पथकाने बोटी आणि सुरक्षा साधनांच्या साहाय्याने राम मंदिरात अडकलेल्या लहान मुलांसह, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना सुखरूप बाहेर काढले. पूरग्रस्त नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. परिसरात आणखी कुठे पाणी साचले आहे का, याचाही आढावा त्यांनी घेतला असून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

यावेळी शत्रुघ्न काटे यांनी नागरिकांना नदीकाठच्या परिसरात जाणे टाळण्याचे, प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ संबंधित यंत्रणेशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

या कठीण प्रसंगात नागरिकांना धीर देताना भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले, "पावसाचा जोर वाढल्याने नदीकाठच्या भागात पाणी शिरले आहे. आम्ही सर्व परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहोत. आपत्कालीन टीम पूर्ण क्षमतेने बचाव कार्य करत आहे. नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे आणि सुरक्षित स्थळी राहावे. कोणत्याही आपत्कालीन मदतीसाठी आम्ही २४ तास उपलब्ध आहोत."

संकटसमयी स्वतः लोकप्रतिनिधी रस्त्यावर उतरून मदत करत असल्याचे पाहून रहाटणीतील नागरिकांनी आणि पूरग्रस्तांनी शत्रुघ्न काटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मीना नदीवरील पुलाला धोका

नारायणगाव (दैनिक संध्या) : सध्या संपूर्ण राज्यात जोराचा पाऊस सुरू असून ओढे नाले वाहू लागले आहे. पुणे नाशिक महामार्गावर पावसाचे पाणी साठून त्याला नदीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.त्यातच जुन्नर तालुक्यातील नारायणगाव जवळील मिना नदी पत्रावरील इंग्रजांच्या काळातील शंभर वर्षापूर्वी बांधण्यात आलेला पूल धोकादायक बनला आहे. जुना पुणे-नाशिक हायवे वरील मीना नदीवरील पूल खचण्याची शक्यता दिसून येत आहे. तसेच या पुलाच्या भिंतींवर, कठड्यांवर पिंपळाची झाडे उगवून त्याच्या मुळ्या पुलात घुसल्यामुळे कालबाह्य झालेल्या या पुलाची संरक्षण भिंत खचण्याची फार मोठी शक्यता निर्माण झाली आहे. लवकरात लवकर संबंधित अधिकाऱ्यांनी याची दखल घेऊन काम करावे अशी मागणी राजे ग्रुपचे अध्यक्ष जुबेर शेख व सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी केली आहे.



### पुण्यात राज्यातील सर्वात मोठी छापेमारी, भेसळ खोरांचा पर्दाफाश

नारायणगाव (दैनिक संध्या) : राज्यात सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या एका मोठ्या दूध भेसळ टोळीचा पुणे ग्रामीण पोलिसांनी स्थानिक गुन्हे शाखा आणि एफडीए (FDA) च्या पथकाने संयुक्त कारवाई करत पर्दाफाश केला आहे. या धडक कारवाईत तब्बल अडीच कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एकूण १३ जणांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. पुणे, सोलापूर, अहिल्यानगर, संभाजीनगर, सांगली आणि भिवंडी अशा तब्बल ६ जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी छापेमारी करण्यात आली. पुण्यातील मंचर येथील दोघांना अटक केल्यानंतर या संपूर्ण रॅकेटचे धागेदोरे हाती लागले आहे. गेल्या दोन वर्षांपासून हा काळा धंदा राजरोसपणे सुरू असल्याची धक्कादायक माहिती आता समोर आली आहे. भेसळीचा हा प्रकार इतका भयानक होता की, वास न येणारा शाम्पू, दुधाची पावडर आणि केमिकल पाण्यात मिसळून ही भेसळ केली जात होती. ५०० लीटर शुद्ध दुधात ३०० लीटर तर १००० लीटर दुधात तब्बल ५०० लीटर केमिकलचे पाणी मिसळले जात होते. हेच विषारी दूध पुढे नामांकित डेअरी कंपन्यांना पुरवले जायचे, ज्यापासून विविध दुग्धजन्य पदार्थ बनायचे आणि घरोघरी दुधाच्या पिशव्यांमधून ते आपल्या मुलाबाळांपर्यंत पोहोचायचे. पुणे ग्रामीण पोलिसांच्या २५ आणि एफडीएच्या २० अधिकाऱ्यांच्या पथकाने ही मोठी कामगिरी चोख बजावली आहे. या रॅकेटमध्ये आणखी बड्या लोकांचा सहभाग असण्याची शक्यता आहे. पोलीस सध्या त्या दृष्टीने सखोल तपास करत आहेत.

### सैन्यदलात शिवछत्रपती कॉलेजच्या विद्यार्थ्यांची निवड

नारायणगाव (दैनिक संध्या) : श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथील दोन विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात 'अग्निवीर' म्हणून निवड झाली आहे. दीपक मारुती बगाड आणि संस्कृत गणेश रसाळ अशी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे असून, त्यांनी आपले खडतर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. यापैकी दीपक बगाड यांची नियुक्ती उत्तर प्रदेश येथे तर संस्कृत रसाळ यांची नियुक्ती पंजाब येथे झाली आहे. या यशानंतर संस्था व महाविद्यालयाच्या वतीने दोन्ही विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. महाविद्यालयात चालवल्या जाणाऱ्या मोफत पोलीस भरती प्रशिक्षण केंद्राचा या प्रवासात मोठा फायदा झाल्याचे दोन्ही विद्यार्थ्यांनी आवर्जून सांगितले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजय शिवाजीराव काळे, अध्यक्ष प्रतिनिधी प्रा. व्ही. बी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एम. बी. वाघमारे, उपप्राचार्य डॉ.आर.डी.चौधरी, उपप्राचार्या व समन्वयक प्रा.पी.एस.लोढा, कला विभाग प्रमुख प्रा. आर. एस. कांबळे, मोफत पोलीस भरती प्रशिक्षण विभागाच्या चेअरमन प्रा. एम. डी. हाडवळे ,सायन्स जेईई व नीट परीक्षा विभाग प्रमुख प्रा.सी.बी. कांबळे, एमसीव्हीसी विभाग प्रमुख प्रा. के. जी. नेटके, पर्यवेक्षक प्रा.एस .ए.श्रीमंते व महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### पंचशील प्रतिष्ठानच्या वतीने जयंती चा खर्च टाळून लोकसेवेसाठी ॲम्ब्युलन्स खरेदी

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : पंचशील प्रतिष्ठान, अष्टापूर यांच्या वतीने दरवर्षी साजरा करण्यात येणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवाचा खर्च टाळून त्या निधीतून समाजोपयोगी रुग्णवाहिका (ॲम्ब्युलन्स) खरेदी करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत दूरदृष्टीचा, लोकहिताचा आणि प्रेरणादायी आहे. समाजात उत्सव साजरे करण्याची परंपरा महत्त्वाची असली, तरी त्याचबरोबर समाजाच्या गरजा ओळखून कायमस्वरुपी उपयुक्त ठरेल असा उपक्रम राबविणे ही खरी सामाजिक बांधिलकी आहे. आपल्या या निर्णयामुळे अष्टापूर व परिसरातील अनेक रुग्णांना वेळेवर वैद्यकीय सेवा मिळण्यास मोठी मदत होईल. अनेकांचे प्राण वाचविण्यासाठी ही रुग्णवाहिका निश्चितच जीवनदायी ठरेल. आपण समाजहिताला प्राधान्य देत कृतीतून आदर्श निर्माण केला पाहिजे. हा उपक्रम इतर सामाजिक संस्था, मंडळे आणि प्रतिष्ठानांसाठीही निश्चितच प्रेरणादायी ठरेल. या हेतूने पंचशील प्रतिष्ठान च्या वतीने हा उपक्रम हाती घेण्यात आला. या समाजहिताच्या अभिनव आणि स्तुत्य उपक्रमाबद्दल पंचशील प्रतिष्ठानचे सर्व कार्यकारिणी सदस्य, सर्व वर्गणीदार यांचे मनपूर्वक आभार. आपल्या हातून भविष्यातही असेच अनेक लोककल्याणकारी उपक्रम घडत राहोत, अशा प्रकारे शुभेच्छा आणि सदिच्छा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आल्या.

### घोडेगाव व आदिवासी भागात मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत

घोडेगाव (दैनिक संध्या) : काल व आज दोन दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे घोडेगाव परिसरातील व आदिवासी भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. घोडनदी व बुब्रानदीला पूर आल्यामुळे डिंभे धरणात पाण्याची मोठ्या प्रमाणात होत आहे. सकाळी ६ वाजता धरणात २.७६ टीएमसी पाणी साठा (१४.१३ टक्के) झाला आहे. चातकासारखी वाट पाहणारे नागरिक आता मुसळधार पावसामुळे हातबल झाले आहेत. आदिवासी भागातील ओढे नाले भरुन वाहत आहेत. खाचरे तुडुंब भरली आहेत. आहुपे, भिमाशंकर व पाटण खोऱ्यात ही गेली दोन दिवस मुसळधार पाऊस पडत आहे. भात रोपे तरारली आहे. घोडेगाव परिसरातील नारोडी, लांडेवाडी, शिंदेवाडी, धोंडमाळ, गोनवडी, गिरवली, चिंचोली या बागायती पट्ट्यात भुईमुग या पिकांचे नुकसान झाले आहे.



# इंद्रायणीच्या महापुराने आळंदी वेढली

## अडीचशे वारकऱ्यांची सुखरूप सुटका, चारही पूल पाण्याखाली

**आळंदी (दै. संध्या)**

मावळ तालुक्यातील मुसळधार पावसामुळे वडीवळे धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याने आळंदीतील इंद्रायणी नदीला महापूर आला आहे. पुरामुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाले असून विविध धर्मशाळा व दर्शन मंडपात अडकलेल्या सुमारे अडीचशे वारकऱ्यांची आळंदी नगरपरिषदेच्या आपत्कालीन पथकाने सुखरूप सुटका करून सुरक्षितस्थळी हलवले. सिद्धबेट, गोपाळपुरा आणि इंद्रायणी तीर परिसरातील अनेक धर्मशाळांमध्ये पुराचे पाणी शिरले. ज्ञानेश्वरी मंदिरातील २०, इंद्रायणी नगरमधील १००, ठाकूरबुवा धर्मशाळेतील ६० तसेच गोपाळपुरा परिसरातील इतर धर्मशाळांमधील सुमारे २० वारकरी पुराच्या पाण्यात अडकले होते. याशिवाय वैतागेश्वर मंदिराजवळील दर्शन बारीमध्ये अडकलेल्या १० वारकऱ्यांचीही नगरपरिषदेच्या आपत्कालीन पथकाने सुखरूप सुटका केली. पुराचा धोका लक्षात घेऊन सिद्धबेट परिसरातील सर्व वारकरी धर्मशाळा तसेच साधकाश्रम ते डुडुळगाव मार्गावरील वारकरी विद्यार्थ्यांच्या धर्मशाळांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाने सर्वांना सुरक्षित ठिकाणी राहण्याच्या आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. महापुराच्या तडाख्यात इंद्रायणी नदीकाठावरील महिलांसाठी उभारण्यात आलेले दोन चेंजिंग रूम वाहून गेले. वैतागेश्वर परिसरातील दर्शन बारीही पुराच्या पाण्यात वाहून गेली. जुन्या व नवीन पुलांवरील संरक्षण कठडे आणि बसविण्यात आलेली जाळी मोठ्या प्रमाणात वाहून गेली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराच्या पश्चिमेकडील शनी मंदिर परिसरातील प्रसाद विक्रेत्यांच्या दुकानांमध्ये पाणी शिरल्याने हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे. साधकाश्रम–ज्ञानेश्वरी मंदिर जोडणारा पूल, देहू फाटा–चाकण मार्गावरील गरुडस्तंभाजवळील पूल तसेच आळंदी नगरपरिषद चौक ते देहू फाटा जोडणारे जुने व नवे दोन्ही पूल पाण्याखाली गेले आहेत. आळंदी–चऱ्होली बाह्यवळण मार्गावरील पुलाच्या कठड्यांपर्यंत पाणी पोहोचले असून तेथे अत्यंत सावधगिरीने वाहतूक सुरू आहे.

दरम्यान, इंद्रायणीच्या दोन्ही घाटांवर पुराचे पाणी शिरले असून नदीकाठच्या घरांसह काही वारकरी संस्था आणि धर्मशाळांमध्येही पाणी घुसले आहे. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन आळंदी देवस्थानने सर्व वारकरी, भाविक आणि नागरिकांना पुढील आदेश मिळेपर्यंत आळंदी शहरात प्रवेश करू नये, असे आवाहन केले आहे. शहरात येणारे नदीवरील चारही पूल पाण्याखाली गेल्याने आळंदीकडे येणे सध्या धोकादायक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आळंदीकडे प्रवास सुरू केलेल्या वारकरी व भाविकांनी ज्या ठिकाणी आहेत तेथेच सुरक्षित थांबावे, पोलीस, नगरपरिषद आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे पालन करावे. अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच नदीपात्र, घाट परिसर आणि बंद करण्यात आलेल्या पुलांकडे जाणे टाळावे. नागरिकांनी संयम राखून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन आळंदी देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.



## नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी केली पूरग्रस्त भागाची पाहणी

**चाकण (दै. संध्या)**

मुसळधार पावसामुळे जुना पुणे नाशिक रस्ता पाण्याखाली गेला असून चाकण शहर आणि बाजारपेठ दमदार पावसामुळे तुंबली आहे. त्यामुळे शहरातील पूरग्रस्त भागाची पाहणी नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी केली आहे.

चाकण शहर आणि परिसरात ढग फुटी सदृश परिस्थिती निर्माण झाली असून दमदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. रस्ते जलमय झाल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली होती. ओढे नाले ओसंडून वाहत असताना स्व.आ. सुरेश भाऊ गोरे यांच्या पत्नी व चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा सुरेशभाऊ गोरे यांनी शहरात जाऊन परिस्थितीची पाहणी केली.

याप्रसंगी नगरपरिषदेचे गटनेते साहेबराव कड, उद्योजक बिपिन रासकर आदींनी परिस्थितीचा आढावा घेतला. रस्त्यांवर पाणी साचल्याने व गटारे तुंबल्याने व्यापाऱ्यांच्या दुकानांनी मोठ्या प्रमाणात पाणी घुसून नुकसान झाले. पुन्हा अशाच परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे, असे साहेबराव कड यांनी स्पष्ट केले.

नैसर्गिक ओढे, नाले आणि पावसाच्या पाण्याच्या प्रवाहात येणारे अडथळे दूर करून नियोजनबद्ध विकास करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. मनीषा गोरे यांनी सांगितले की," नगरपरिषद प्रशासनाने मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन यंत्रणा अलर्ट ठेवली आहे.

## बकोरी येथे १०० वृक्षांचे वृक्षारोपण



**कोरेगावमुळ (दै. संध्या)**

आंतरराष्ट्रीय डॉक्टर्स डे चे औचित्य साधून असोसिएटेड डॉक्टर्स ग्रुप व हवेली तालुका डॉक्टर्स ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने, मणिपाल हॉस्पिटलच्या प्रायोजकत्वाखाली बकोरी येथील देवराई वनराई प्रकल्पात रविवारी वृक्षारोपण अभियान उत्साहात पार पडले. या उपक्रमात सुमारे ७० डॉक्टरांनी सहभाग घेत १०० वृक्षांची लागवड केली. 'एक डॉक्टर – पाच झाडे' या संकल्पनेवर आधारित या अभियानातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी डॉक्टरांनी आपले प्रिय गुरुवर्य कै. डॉ. चंद्रकांत गंगाराम कोलते यांच्या नम्र स्मृतीप्रित्यर्थ अर्जुन वृक्षाचे रोपण करून त्यांना अभिवादन केले. कार्यक्रमास बकोरी देवराई वनराई प्रकल्पाचे प्रकल्प प्रमुख चंद्रकांत वारघडे यांचे विशेष सहकार्य लाभले. वृक्षारोपणानंतर सहभागींसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी डॉ. मच्छिंद्र काशिद म्हणाले, 'असोसिएटेड डॉक्टर्स ग्रुप आणि हवेली तालुका डॉक्टर्स ग्रुपच्या माध्यमातून डॉक्टर्स डे निमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे आरोग्य तपासणी शिबिरानंतरचा दुसरा उपक्रम म्हणजे पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण अभियान.

आज ७० डॉक्टरांनी एकत्र येऊन १०० वृक्षांचे वृक्षारोपण केले. आमचे प्रिय वंदनीय गुरुवर्य कै. डॉ. चंद्रकांत गंगाराम कोलते यांच्या नम्र स्मृतीप्रित्यर्थ अर्जुन वृक्षाची लागवड करण्यात आली. समाजाने पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे'. या अभियानासाठी मणिपाल हॉस्पिटलचे प्रायोजकत्व लाभले. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी सर्वच डॉक्टरांनी विशेष परिश्रम घेतले. सहभागी सर्व डॉक्टर्स आणि सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे आयोजकांनी आभार मानले.

## चाकणजवळ पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांची सुखरूप सुटका

**चाकण (दै. संध्या)**

- मुसळधार पावसात एनडीआरएफच्या जवानांची कौतुकास्पद कामगिरी

चाकण लगतच्या आरुवस्तीत पुराच्या पाण्यात अडकलेल्या सुमारे ७० नागरिकांना राष्ट्रीय आपत्ती दलाने अर्थात एनडीआरएफने सुखरूप बाहेर काढले.

मागील तीन दिवसांपासून चाकण शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे ओढे नाल्यांना पूर आल्याने ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. सखल भागात पाणी साचल्याने पाणी थेट भाडेकरूंच्या रूममध्ये शिरले. खेड तालुक्याच्या पश्चिम भागात, विशेषतः चाकण परिसरात, गेल्या तीन दिवसांपासून अतिवृष्टी सुरू आहे. याचा फटका आरु वस्तीला बसला. ही वस्ती आंबेठाण आणि खराबवाडी या दोन गावांच्या सीमेवर असून, सखल भागात वसलेली आहे. स्थानिक नागरिकांनी भाडेकरूंसाठी बांधलेल्या भाड्याच्या खोल्यांमध्ये पावसाचे पाणी शिरले. रस्त्याच्या कडेला असलेल्या मोऱ्या बुजवल्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण झाला आहे.

पावसाचे पाणी वेगाने वाढत असल्याने त्यांच्या घरांमध्ये पाणी शिरले. सुदैवाने, ही इमारत दुमजली असल्याने अडकलेल्या नागरिकांनी वरच्या मजल्यावर आश्रय घेतला. मात्र, पावसाचा जोर कायम असल्याने आणि पाणी वाढतच असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता वाटते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येताच प्रशासनाने तातडीने एनडीआरएफला मदतीसाठी संपर्क साधला. एनडीआरएफचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी अत्यंत शर्थीचे प्रयत्न करून अडकलेल्या सर्व नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. या बचाव मोहिमेमुळे संभाव्य जीवितहानी टळली. प्रशासनाच्या योग्य नियोजनामुळे आणि एनडीआरएफच्या तत्परतेमुळे नागरिकांचे प्राण वाचले आहेत.

एनडीआरएफच्या मदतीने नागरिकांची सुटका झाली. प्रशासकीय यंत्रणांचे मोलाचे सहकार्य व सामुदायिक सहकार्याने बचाव कार्य यशस्वी झाले. या बचाव मोहिमेत केवळ एनडीआरएफचे पथकच नव्हे, तर स्थानिक पातळीवरही अनेक यंत्रणांनी मोलाचे सहकार्य केले. यामध्ये स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन, अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी, पोलीस, तलाठी, पोलीस पाटील यांचा समावेश होता. सर्पमित्र शांताराम गाडे यावेळी मदत कार्यात सहभागी झाले होते. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच ही बचाव मोहीम यशस्वीपणे पार पडली.



**नियोजनाची गरज**

“जल निस्सारण व्यवस्था सुधारण्याची आणि सखल भागातील बांधकामांबाबत योग्य नियोजन करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. प्रशासनाने यावर ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. सलग पावसामुळे जिल्ह्याला मोठा फटका बसला असून, प्रशासनाकडून मदतीचे प्रयत्न सुरू आहेत.”

# वाल्मिकी ऋषींच्या पालखी सोहळ्याचे १५ जुलैला प्रस्थान



**वाल्मिकींच्या समाधीवर अभिषेक**

माउलींच्या पालखी सोहळ्यापाठोपाठ वाल्मिकींच्या पालखी सोहळ्याचे १५ जुलैला पंढरपूरकडे प्रस्थान होणार असून प्रस्थानापूर्वी वाल्मिकींच्या समाधीवर पुरोहितांच्या साक्षीने अभिषेक घालण्यात येणार आहे. तर पालखी रथासह वाल्मिकींच्या पादुकांचे पूजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येणार असून या सोहळ्याला वाल्हे परिसरातील ग्रामस्थ भजनी मंडळे व वारकरी संप्रदाय मोठ्या प्रमाणावर सहभागी होणार असल्याचे चित्र स्पष्ट आहे.

**वाल्हे (दै. संध्या)**

पिटू भक्तीचा डांगोरा !
कळी काळाशी दरारा !!
तुका म्हणे करा !
जयजयकार आनंदे !!

या उक्तीला अनुसरून रामायणाचे रचिते महर्षी वाल्मिकी ऋषींचा पालखी सोहळा सालाबादप्रमाणे यंदाही विठूरायाच्या दर्शनासाठी श्री क्षेत्र पंढरपूरला जाणार आहे.या पालखी सोहळ्याचे प्रस्थान येत्या १५ जुलैला वाल्हे (ता. पुरंदर) येथील महर्षी वाल्मिकींच्या संजीवन समाधी मंदिरातून होणार असल्याची माहिती पालखी सोहळ्याचे संस्थापक ह.भ.प.अशोक महाराज पवार यांनी दिली .

यावेळी माउलींचा पालखी सोहळा मंगळवारी (१४ जुलै ) वाल्हे नगरीत मुक्कामी विसावणार आहे.तर दुसऱ्या दिवशी पहाटे माउलींच्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान झाल्यानंतर बुधवारी (१५जुलै ) साधारण ९ च्या सुमारास महर्षी वाल्मीकी ऋषींच्या पालखी सोहळ्याचे देखील प्रस्थान होणार असून या पालखी सोहळ्याचा पहिला मुक्काम सातारा जिल्ह्यातील पाडेगाव येथे होणार आहे.

त्यानंतर गुरुवारी (१६जुलै) साखरवाडी, शुक्रवार(१७ जुलै) सांगवी, शनिवार (१८ जुलै) मठाचीवाडी, रविवार (१९ जुलै) शिंदेवाडी, सोमवार (२० जुलै ) फोंडशिरस, मंगळवार (२१जुलै) अकलूज बुधवार (२२ जुलै ) मळखांबी

गुरुवारी (२३ जुलै ) भंडी शेगाव येथे पालखीचा मुक्काम होणार आहे.

अशातच भंडी शेगावचा मुक्कम आटोपल्यावर वाखरी येथे दुपारचा विसावा घेऊनच पालखी सोहळा विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर मध्ये शुक्रवारी ( २४ जुलै) मुक्कामी दाखल होणार आहे. यावेळी वाल्मिकींचा पालखी सोहळा सलग दोन दिवस पंढरपूरात मुक्कामी राहणार आहे तर

परती चा प्रवास रविवारी (२६ जुलै) दुपारी सुरु होणार असून परतीच्या प्रवासात शेवटचा मुक्काम थेट वाल्हे येथील कामठवाडी येथे होणार आहे.

सोमवारी (२७ जुलै ) महर्षी वाल्मीकी ऋषींच्या समाधी मंदिरात या सोहळ्याची सांगता होणार असून शेवटची पंगत रणधीर खवले यांची होणार असल्याची माहिती पालखी सोहळ्याचे चोपदार लक्ष्मण बुनगे यांनी दिली.

## चाकण भागात भटक्या कुत्र्यांची दहशत; नागरिक त्रस्त

**चाकण (दै. संध्या)**

चाकण भागात भटक्या कुत्र्यांनी मोठ्या प्रमाणात उच्छाद मांडला असून, कुत्र्यांच्या दहशतीने नागरिक त्रस्त झाले आहेत. दोन महिन्यांपूर्वी चाकण मध्ये कुत्र्यांच्या हल्ल्यात एक महिला ठार झाल्याची व एकाच दिवसात १३ जणांवर जीवघेणा हल्ला केल्यानंतर मेदनकरवाडी (ता. खेड) येथे कामावर जाणाऱ्या एका ३६ वर्षीय महिला कामगारावर कुत्र्यांच्या टोळक्याने भीषण हल्ला केला होता. कुत्र्यांचे हल्ले वाढत चालले असून वारंवार होणाऱ्या अशा घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महिलेला कुत्र्याने ठार केल्याची घटना ही या भागातील पहिलीच घटना नाही. तर यापूर्वी मेदनकरवाडी येथे एक मुलगी कुत्र्यांच्या हल्ल्यात ठार झाली. धक्कादायक म्हणजे चार जानेवारीला चाकण शहरात पिसाळलेल्या कुत्र्यांनी चक्क एकाच वेळी ३३ नागरिकांना चावा घेतला होता. चाकण परिसरात अनेक ठिकाणी लहान मुलांवर भटक्या कुत्र्यांनी जीवघेणे हल्ले केल्याच्या नोंदी प्रशासनाकडे आहेत. मानवावर हल्ला करून ठार करणारी कुत्री म्हणजे लांडग्याची नवी प्रजात असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

“भटक्या कुत्र्यांना पकडणे व त्यांना एका ठिकाणी ठेवून त्यांचे निर्बीजीकरण करणे यासाठी ठेकेदाराला काम देण्यात आले आहे. यासाठी वर्षभराला सुमारे दहा लाख रुपयांचा खर्च करण्यात येत असून, आजपर्यंत सहाशे कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आले आहे.”
**- डॉ. अंकुश जाधव, मुख्याधिकारी, चाकण नगरपरिषद**

“नागरिकांनी घरातील अन्न रस्त्यावर फेकण्याचे टाळल्यास भटक्या व हिंसक कुत्र्यांचा वावर कमी होण्यास मदत होईल. कुत्र्यांवरील हल्ले रोखण्यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना करणे अपेक्षित आहे.”
**- राहुलदादा कांडगे, माजी नगरसेवक, चाकण**




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘श्री संत गुलाबराव महाराज’ जयंतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : वेद, शास्त्र आणि भारतीय संस्कृतीचे अभ्यासक श्री संत गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी श्री. संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर, कक्ष अधिकारी निलेश हरड व संदेश उतेकर, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक कक्ष अधिकारी विजय शिंदे, अमोल चव्हाण आणि विनोद सोरटे यांनीही श्री. संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

### तृतीयपंथीयांना स्वयंरोजगारासाठी ‘बीज भांडवल योजना’

मुंबई (दैनिक संध्या) : तृतीयपंथीयांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत ‘बीज भांडवल योजना’ राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत स्वयंरोजगारासाठी तृतीयपंथीयांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. इच्छुक तृतीयपंथीयांनी शासनाने विहित केलेल्या नमुन्यात दिलेल्या https://tinyurl.com/22wpc5j2 लिंकवर जावुन अर्ज डाऊनलोड करुन अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त, समाजकल्याणबीज भांडवल योजना कार्यालयात सादर करावा असे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने केले आहे. या योजनेचा उद्देश तृतीयपंथीयांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणे, कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षणाद्वारे शाश्वत रोजगार निर्माण करणे तसेच त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास साधणे हा आहे. लघुउद्योग व सूक्ष्म व्यवसाय सुरू करण्यासाठी बीज भांडवल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना लघु कर्ज (२५ हजार रुपये), मध्यम कर्ज (५० हजार रुपये) आणि दीर्घ कर्ज (२ लाख रुपये) अशा तीन प्रकारांत कर्ज उपलब्ध होईल. यामध्ये लाभार्थ्याचा ५ टक्के, शासनाचा ४५ टक्के आणि राष्ट्रीयकृत बँकेचा ५० टक्के आर्थिक सहभाग राहणार आहे.

### राज्यपालांचे गुलाबराव महाराज यांना अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांच्या जयंती निमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी महाराष्ट्र लोकभवन येथे गुलाबराव महाराजांच्या छायाचित्राला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी लोकभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### आपत्कालीन परिस्थितीत संपर्क करण्याचे आवाहन

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यात उद्भवलेल्या संभाव्य पूरपरिस्थिती आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला पूर्णपणे सतर्क राहण्याचे आणि प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. राज्यात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना तातडीने मदत मिळावी, यासाठी राज्य सरकारची संपूर्ण यंत्रणा सज्ज असून २४ तास कार्यरत असणारे नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूत्रांकडून येणाऱ्या माहितीचा आधार घ्यावा आणि संकटसमयी जाहीर केलेल्या अधिकृत हेल्पलाईन क्रमांकांवर त्वरित संपर्क साधावा, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. राज्यस्तरीय मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी १०७० हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिक ०९३२१५८७१४३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा ०२२-२२०२७९९० आणि ०२२-२२७९४२२९ या दूरध्वनी क्रमांकांवर देखील थेट संपर्क साधू शकतात.

# पावसाच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणा २४ बाय ७ ‘अलर्ट मोड’वर ठेवा – मुख्यमंत्री

**राज्यातील पावसाच्या परिस्थितीचा मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षातून घेतला आढावा**

■ अत्यावश्यक असल्याशिवाय दोन दिवस नागरिकांनी घराबाहेर पडू नये

■ मुंबई (दै. संध्या)




मुंबईसह किनारी भागातील जिल्ह्यात वाऱ्याचा ताशी वेग ५० ते ७० किलोमीटर प्रति तास असण्याची शक्यता आहे. यासोबतच आज दुपारी ३ ते ४.३० वाजे दरम्यान समुद्राला भरती येण्याची शक्यताही आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी २४ बाय ७ अलर्ट मोडवर राहून आपत्कालीन परिस्थिती आल्यास तातडीने मदत कार्य करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. राज्यभरात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याने आज आणि उद्या अत्यावश्यक काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये , असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

राज्य आपत्ती नियंत्रण कक्षामध्ये आयोजित बैठकीत राज्यातील पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हवामान विभागाच्या अंदाजानुसार मुंबई आणि किनारी भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस अपेक्षित आहेत. अपेक्षित उच्च भरतीच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांना ‘अलर्ट मोड’वर ठेवण्यात आले आहेत. पुराची परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने ‘एसडीआरएफ’ आणि ‘एनडीआरएफ’ ची पथके रवाना करण्यात यावी. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना तातडीने मदत मिळेल, याची काळजी घ्यावी. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील अडथळे तात्काळ दूर करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याशी समन्वय साधून महामार्गावरील मलबा हटविण्यात यावा. पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन संभाव्य दरड कोसळणाऱ्या ठिकाणी पथके सज्ज ठेवावीत. तसेच मुंबई-गोवा महामार्गावर यावेळी अनपेक्षित ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी सज्ज राहून दरडीचा मलबा तात्काळ हटविण्यात यावा. कुठल्याही परिस्थितीत वाहतुकीचे कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अरबी समुद्रावर बनत असलेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे नाशिक जिल्ह्याच्या बऱ्याचशा भागात उद्या ढगफुटी सदृश्य पाऊस होण्याची दाट शक्यता आहे. हा पाऊस बऱ्यापैकी त्र्यंबकेश्वर व आजूबाजूच्या परिसरात पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून सुमारे ३०० मिलिमीटर पाऊस अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत नाशिक जिल्हा प्रशासनाने सज्ज राहून सखल भागात पाणी साचणार नाही, यासाठी उपाययोजना कराव्यात. कुठेही जीवित हानी होणार नाही, याबाबतही दक्ष रहावे.

## मजिप्रा, जलजीवन मिशनच्या कामांना गती द्या – मंत्री गुलाबराव पाटील



■ मुंबई (दै. संध्या)

अमरावती जिल्ह्यात उन्हाळ्यामध्ये विविध गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. अचलपूर, चांदूरबाजार तालुक्यातील २३ गावांना पाण्याचे स्त्रोत जवळ नसल्याने १५ किमीवरून पाणी आणावे लागते. नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय होण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जल जीवन मिशनमधील प्रलंबित कामांना गती द्यावी, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत मंत्री पाटील बोलत होते. आमदार बच्चू कडू, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव अमगोथू रंगानायक, उपसचिव मंत्रा मानकामे, मजिप्राचे अधीक्षक अभियंता अजय सिंह, मजिप्राचे अमरावतीचे अधीक्षक अभियंता संतोष गव्हाणकर, कार्यकारी अभियंता विवेक सोळंके, अमरावती जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता स्नेहा धावडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी तर अमरावतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे यावेळी उपस्थित होते.

मंत्री पाटील यांनी सांगितले की, चिखलदऱ्याच्या ग्रामीण भागातील ३६ गावांना आजही टँकरने पाणीपुरवठा होतो, ही गंभीर बाब आहे. मजिप्रा, जलजीवन मिशन योजना निधीअभावी रखडू देवू नका. दुर्गम भागातील पाणीपुरवठ्याला प्राधान्य द्या. मेळघाटातील योजना आदिवासी आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेवून जास्तीत जास्त निधी मिळण्यासाठी प्रयत्न करावेत. अचलपूर आणि चांदूरबाजार भागातील काही गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांमधून सुटलेली आहेत. गावांच्या मागणीनुसार सद्य:वस्तुस्थितीचे पुन्हा सर्वेक्षण करून १५ दिवसात अहवाल सादर करावा, त्यानंतर त्या गावांचा मजिप्रा योजनेत समावेश करावा, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

अचलपूर तालुक्यातील २४ गावातील जलजीवन मिशनची ८० टक्के; तर चांदूरबाजारमधील कामे ९८ टक्के पूर्ण झाली आहेत. यामधील ८३ गावात पाणीपुरवठा सुरू झाला आहे. मात्र ८ ते १० गावात योजना पूर्ण होवूनही पाण्याचे स्त्रोत उपलब्ध नसल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पाण्याचे स्त्रोत जवळचे शोधण्याऐवजी दूरचे शोधून पाणीपुरवठा करण्याच्या सूचनाही मंत्री पाटील यांनी दिल्या. मजिप्राच्या योजना त्वरित पूर्ण करून काही गावांचे स्थलांतर थांबवावे. आदिवासी, दुर्गम भाग, व्याघ्र प्रकल्प याबाबतच्या अडचणी समजून केंद्राच्या निधीची वाट न पाहता राज्य शासनाने उपाययोजना करण्याची मागणी आमदार श्री. कडू यांनी केली.

## पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांची मुलाखत

■ मुंबई (दै. संध्या)




राज्यातील शेती अधिक सक्षम, समृद्ध आणि शाश्वत करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या ‘सत्यमेव जयते फार्मर कप २०२६’ या महत्त्वाकांक्षी उपक्रमाविषयीची विशेष मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित ‘जय महाराष्ट्र’ आणि ‘दिलखुलास’ या कार्यक्रमांतून प्रसारित होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून पुढे आलेल्या या उपक्रमाच्या विविध पैलूंवर पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी सविस्तर माहिती दिली आहे. या विशेष मुलाखतीत ‘सत्यमेव जयते फार्मर कप २०२६’ची संकल्पना, उद्दिष्टे, गटशेतीचे महत्त्व, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जलसंधारण, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवरील पीक नियोजन तसेच महाराष्ट्राच्या शेतीचे भविष्य या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी एकत्र येत सामूहिक नियोजन, शाश्वत शेती आणि तंत्रज्ञानाधारित शेतीचा स्वीकार करावा, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचेही श्री. भटकळ यांनी मुलाखतीत स्पष्ट केले आहे. ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार, ७ जुलै २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित करण्यात येणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवरही ती उपलब्ध होणार आहे. ‘दिलखुलास’ कार्यक्रमात ही मुलाखत ९ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून आणि ‘न्यूज ऑन एआयआर’ या मोबाईल ॲपवर प्रसारित होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदिका पूनम चांदोरकर यांनी केले आहे. या मुलाखतीत राज्यातील १८ हजार शेतकरी गटांपासून सुरू झालेल्या या उपक्रमाचा विस्तार, गटशेतीची संकल्पना, उत्पादनवाढ आणि खर्चबचतीतील संभाव्य परिणाम, महिला शेतकरी गटांचा सहभाग, तसेच कृषी विभाग, पाणी फाउंडेशन आणि शेतकरी यांच्यातील समन्वय यांचा आढावा घेण्यात आला आहे. याशिवाय स्मार्ट शेती ॲप, डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रशिक्षित मेंटर्स, जलसंधारण, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवरील नियोजन, ग्रामीण तरुणांचा सहभाग आणि महाराष्ट्राच्या शेतीसाठी पुढील पाच ते सात वर्षांचे व्हिजन या विषयांवरही या मुलाखतीत सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

## एंट्री पॉईंटजवळ दरड कोसळलेल्या घटनेची शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केली प्रत्यक्ष पाहणी

■ मुंबई (दै. संध्या)



मुंबई-पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पाच्या एंट्री पॉईंटजवळ दरड कोसळल्याच्या घटनेनंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी एमएसआरडीसीचे वरिष्ठ अधिकारी, पोलीस प्रशासन तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

घटनास्थळी पाहणीनंतर मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पाण्याच्या प्रवाहात अचानक बदल झाला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात दगड व माती खाली आली. या घटनेत कनेक्टिंग लिंकच्या बोगद्याला कोणत्याही प्रकारची हानी झालेली नाही. मात्र, एंट्री पॉईंट परिसरातील शोसाठी असलेल्या स्लॅबचा तसेच संरक्षण भिंतीचा काही भाग कोसळून खाली पडण्याचा प्रकार घडला आहे. सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि दाट धुक्यामुळे डोंगराच्या माथ्यावर नेमकी काय परिस्थिती निर्माण झाली आहे, याचे अचूक निरीक्षण करणे शक्य होत नाही. पाऊस ओसरल्यानंतर तज्ज्ञांकडून सविस्तर तांत्रिक पाहणी करण्यात येईल. पाण्याच्या प्रवाहात नेमका कशामुळे बदल झाला आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कोणत्या कायमस्वरूपी उपाययोजना कराव्या लागतील, याबाबतचा निर्णय त्यानंतर घेतला जाईल. दरम्यान, रस्त्यावर पडलेला स्लॅब व इतर मलबा हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून ते शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. रस्ता वाहतुकीसाठी सुरू करायचा अथवा नाही, याबाबतचा अंतिम निर्णय पोलीस प्रशासन आणि एमएसआरडीसी यांच्या संयुक्त पाहणी व सुरक्षा मूल्यमापनानंतर घेतला जाईल. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत सर्व निर्णय घेतले जातील, असेही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी स्पष्ट केले.

# ठाणे जिल्हा प्रशासन सतर्क; जनजीवन सुरळीत ठेवण्यासाठी यंत्रणा कार्यरत

**नदीपातळीवर सातत्याने लक्ष; एनडीआरएफच्या दोन तुकड्या तैनात**

■ भिवंडी (दै. संध्या)

जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित यंत्रणांना सतर्क ठेवले असून नागरिकांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. पावसामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीवर जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षामार्फत सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून, आवश्यक त्या ठिकाणी तातडीने मदत व बचावकार्य करण्यात येत आहे. रेल्वे व रस्ते वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यरत असून, एनडीआरएफच्या दोन तुकड्याही जिल्ह्यात तैनात करण्यात आल्या आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ व निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप माने आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ यांनी दिली.

जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाच्या दि.६ जुलै २०२६ रोजी सकाळी ८ वाजेपर्यंतच्या अहवालानुसार, जिल्ह्यात मागील २४ तासांत २३७.६३ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. दि. १ जूनपासून आतापर्यंत जिल्ह्यात एकूण ७०५.६५ मि.मी. पर्जन्यमान नोंदविण्यात आले आहे.

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नद्या आणि धरणांच्या पाणीपातळीचे सातत्याने निरीक्षण करण्यात येत आहे. उल्हास नदीच्या मोहने, जांभूळपाडा आणि बदलापूर येथील पाणीपातळीवर प्रशासनाचे विशेष लक्ष आहे. बदलापूर आणि जांभूळपाडा येथे पाणीपातळीने इशारा पातळी ओलांडली असली, तरी संबंधित यंत्रणांना सतर्क ठेवण्यात आले आहे. कल्याण तालुक्यातील काळू नदी तसेच शहापूर तालुक्यातील भातसा नदीची पाणीपातळी धोक्याच्या पातळीपेक्षा कमी आहे. धरणांमधील पाणीसाठा आणि विसर्गाची माहितीही नियमितपणे घेतली जात असून, परिस्थितीनुसार आवश्यक खबरदारीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. अतिवृष्टीमुळे कसारा घाट परिसरात रेल्वे मार्गावर आलेला मलबा रेल्वे प्रशासनाने तातडीने हटविला असून, मुंबईकडे येणारी रेल्वे वाहतूक पूर्ववत करण्यात आली आहे. जिल्ह्यातील लोकल रेल्वे सेवा सुमारे २० ते २५ मिनिटे उशिराने सुरू आहे. मात्र, रेल्वे वाहतूक सुरू ठेवण्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यरत आहेत. जिल्ह्यातील रस्ते वाहतूकही सुरळीत सुरू असल्याची माहिती आपत्ती नियंत्रण कक्षाने दिली आहे. आपत्कालीन परिस्थितीला तातडीने प्रतिसाद देण्यासाठी National Disaster Response Force अर्थात एनडीआरएफच्या दोन तुकड्या आणि ३० अधिकारी व जवान ठाणे जिल्ह्यात तैनात करण्यात आले आहेत. यामुळे आवश्यकतेनुसार मदत व बचावकार्य अधिक वेगाने राबविण्यास प्रशासन सज्ज आहे.




अंबरनाथ तालुक्यातील नागाव परिसरात एका मुलाला नदीच्या प्रवाहातून बाहेर काढण्यासाठी शोध व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. स्थानिक प्रशासन आणि संबंधित बचाव यंत्रणा घटनास्थळी कार्यरत आहेत.

दरम्यान, अतिवृष्टीच्या कालावधीत विविध ठिकाणी घडलेल्या दुर्घटनांमध्ये जीवितहानी झाली असून काही नागरिक जखमी झाले आहेत. संबंधित घटनांची नोंद घेऊन प्रशासनामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

आपत्तीच्या काळात नागरिकांनी नदी, नाले, पूल, सखल भाग आणि धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे, प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

जिल्ह्यातील पर्जन्यमान, नदीपातळी, धरणांतील पाणीसाठा, वाहतूक व्यवस्था आणि संभाव्य आपत्कालीन परिस्थितीवर जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षामार्फत चोवीस तास लक्ष ठेवण्यात येत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहेत. जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणा सतर्क असून जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ तसेच जिल्ह्यातील सर्व उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग, महावितरण यांच्यासह विविध शासकीय यंत्रणांचे वरिष्ठ व क्षेत्रीय अधिकारी परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहेत. नियंत्रण कक्ष आणि क्षेत्रीय यंत्रणांमध्ये समन्वय ठेवण्यात आला असून, नागरिकांकडून मिळणाऱ्या माहितीवर तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे.

> नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे आणि नदी, नाले, धबधबे, पूल व पाणी साचलेल्या रस्त्यांवरून प्रवास करण्याचे टाळावे, झाडाखाली उभे राहणे, खरोखरच गरज असेल तेव्हाच घराबाहेर पडावे, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून प्रसारमाध्यमे, सोशल मीडियाच्या माध्यमातून वारंवार करण्यात येत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### दरड कोसळल्याने पुणे–मुंबई द्रुतगती मार्ग आणि जुना महामार्ग बंद

पुणे (दैनिक संध्या) : सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे घाट परिसरात दरड कोसळण्याच्या घटना घडत असून, त्याचा फटका पुणे–मुंबई मार्गावरील वाहतुकीला बसला आहे. दरड कोसळल्यामुळे पुणे–मुंबई द्रुतगती मार्ग (एक्सप्रेसवे) तसेच जुना मुंबई–पुणे महामार्ग या दोन्ही मार्गांवरील वाहतूक गंभीरपणे प्रभावित झाली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने पुणे–मुंबई आणि मुंबई–पुणे या दोन्ही दिशेची वाहतूक पुढील आदेशापर्यंत पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली असून, दरड हटविण्याचे आणि रस्ता सुरळीत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. दरम्यान, नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत पुणे–मुंबई किंवा मुंबई–पुणे असा प्रवास टाळावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. अत्यावश्यक प्रवास असल्यास प्रशासन आणि वाहतूक पोलिसांकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत सूचना व अद्ययावत माहितीची खातरजमा करूनच प्रवास करावा, असेही सांगण्यात आले आहे. मुसळधार पावसाचा जोर कायम असल्याने नागरिकांनी खबरदारी घ्यावी आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



### अजित पवार यांच्या स्मृतिस्थळी सुधा मूर्ती, मालीवाल व सुनेत्रा पवार यांचे अभिवादन

बारामती (दैनिक संध्या) : जुलै बारामती येथे आयोजित कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून राज्यसभा खासदार तथा समाजसेविका सुधा मूर्ती आणि खासदार स्वाती मालीवाल उपस्थित होत्या.यावेळी त्यांनी विद्या प्रतिष्ठान येथील राज्याचे लोकप्रिय दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या स्मृतिस्थळी भेट देऊन पुष्प अर्पण करत भावपूर्ण आदरांजली वाहिली. याप्रसंगी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार या देखील उपस्थित होत्या. त्यांनीही स्मृतिस्थळी पुष्प अर्पण करून दिवंगत अजितदादा पवार यांच्या कार्याला विनम्र अभिवादन केले. स्मृतिस्थळी उपस्थित मान्यवरांनी अजितदादा पवार यांनी शिक्षण, सहकार,ग्रामीण विकास आणि समाजकारण क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाचे स्मरण करत त्यांच्या कार्याला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

### तुकाराम महाराज पालखीपूर्वी पुणे-सोलापूर महामार्गाची दयनीय अवस्था

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याला अवघे काही दिवस शिल्लक असताना पुणे-सोलापूर महामार्गाची अत्यंत दयनीय अवस्था कायम असल्याने वारकरी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. महामार्गाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडे गेल्यानंतरही पालखी मार्गाच्या दुरुस्तीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज हिरामण काकडे यांनी प्रशासनाला दोन दिवसांचा अल्टिमेटम देत, कामे पूर्ण न झाल्यास लोकप्रतिनिधी व नागरिकांसह तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. काकडे यांनी सांगितले की, पालखी मार्गासाठी शासनाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर होतो. मात्र प्रत्यक्षात महामार्गावर मोठमोठे खड्डे, उखडलेल्या साईडपट्ट्या, तुटलेल्या सुरक्षा जाळ्या, चिखलमय सेवा रस्ते, वाढलेली काटेरी झाडे-झुडपे आणि साचलेल्या पावसाच्या पाण्यामुळे वारकऱ्यांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. "अधिकारी केवळ पाहणीचे दिखावे करतात; प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही बदल होत नाही," असा आरोपही त्यांनी केला. ७ जुलै रोजी देहू येथून संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे प्रस्थान होणार असून, लाखो वारकरी पायी पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहेत.

## शिवराज्याभिषेक दिन म्हणजे हिंदुस्थान साठी युगप्रवर्तक दिन

पुणे (दै. संध्या)

■ शिवव्याख्याते सौरभ करडे : विश्व हिंदू परिषद पुणे महानगर श्री शिवराज्याभिषेक अभिवादन समिती किल्ले सिंहगड तर्फे शिवशंभू व्याख्यान



छत्रपती शिवाजी महाराज यांना पन्नास वर्षांचे आयुष्य लाभले. त्यामधील ३६ वर्ष हे त्यांचे राजकीय आयुष्य होते. या ३६ वर्षांमध्ये सर्वकाळ त्यांचा युद्ध-लढाया अशा संघर्षामध्ये गेला. स्वराज्य निर्मितीसाठी अहोरात्र झटणाऱ्या छत्रपती शिवरायांच्या कर्तृत्वाला संपूर्ण हिंदुस्तानमध्ये मान्यता ही शिवराज्याभिषेकामुळे मिळाली. शिवराज्याभिषेक ही केवळ घटनाच नव्हे तर हिंदुस्तानसाठी आणि प्रत्येक हिंदू साठी तो युगप्रवर्तक दिन होता, असे मत शिवव्याख्याते सौरभ करडे यांनी व्यक्त केले.

विश्व हिंदू परिषद पुणे महानगर, श्री शिवराज्याभिषेक अभिवादन समिती किल्ले सिंहगड यांच्यातर्फे हिंदू साम्राज्य दिन व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त सौरभ करडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन स.प. महाविद्यालयातील लेडी रमाबाई हॉल येथे करण्यात आले. यावेळी विश्व हिंदू परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे मंत्री किशोर चव्हाण, शरद जगताप, केतन घोडके संतोष अनगोळकर आदी यावेळी उपस्थित होते.

सौरभ करडे म्हणाले , पुरंदरचा तह झाल्यानंतर स्वराज्यातील किल्ले आणि हजारो एकर प्रांत शिवरायांना द्यावा लागला. तहातील अटीनुसार औरंगजेबाच्या दरबारामध्ये जावे लागेल. औरंगजेबाच्या दरबारातून सुटून आल्यानंतरही छत्रपती शिवाजी महाराज यांनी अडीच वर्ष तह कायम ठेवला, परंतु औरंगजेबाने जेव्हा हिंदू मंदिरांना फोडण्याचा, हिंदूंवर जीजीया कर लादण्याचा आदेश दिला त्यानंतर मात्र छत्रपती शिवाजी महाराज पेटून उठले आणि त्यांनी पुढील केवळ ३६ दिवसांमध्ये तहातील सर्व किल्ले आणि प्रांत जिंकून घेतला.

औरंगजेबाने काशी विश्वनाथ मंदिर फोडले. हिंदूंवर अत्याचार केले, हे सर्व उघड्या डोळ्यांनी गागाभट्ट आणि कवी भूषण पाहत होते. त्यांनी अखेर हिंदूंचे स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे यासाठी जिजाऊ आई साहेबांची भेट घेतली आणि शिवराज्याभिषेकाची कल्पना जिजाऊ आईसाहेबांसमोर मांडली. ही कल्पना प्रथम शिवाजी महाराजांना खर्चामुळे मान्य नव्हते, परंतु स्वराज्याला अधिकृत मान्यता मिळण्यासाठी आणि जिजाऊ साहेबांच्या शब्दासाठी त्यांनी शिवराज्याभिषेकासाठी मान्यता दिली.

शिवराज्याभिषेकामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांनी अहोरात्र कष्ट करून निर्माण केलेल्या स्वराज्याला संपूर्ण हिंदुस्तान मध्ये मान्यता मिळाली. हिंदुस्थानच्या बाहेरून येऊन देशावर राज्य करणाऱ्यां ऐवजी या देशातील मातीमध्ये जन्मलेला राजा प्रथमतः या देशात छत्रपती झाला. शिवराज्याभिषेक ही केवळ एक घटना नव्हती तर त्यानंतर हिंदूंसाठी आणि हिंदवी स्वराज्यासाठी युगप्रवर्तक दिन अवतरले . त्यामुळेच आजही देशातील हिंदू ताठ मानेने जगू शकतात आणि हिंदू म्हणून स्वाभिमानाने राहू शकतात ही छत्रपती शिवाजी महाराज यांचे आपल्यावर उपकार आहेत, असेही सौरभ करडे यांनी यावेळी सांगितले.



## अध्यक्षपदी ॲड. सचिन वाघ यांची बिनविरोध निवड

बारामती (दै. संध्या): बारामती वकील संघटनेच्या सन २०२६–२०२७ च्या होऊ घातलेल्या निवडणुकीत ज्येष्ठ फौजदारी वकील ॲड.सचिन वाघ यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. शिव,फुले,शाहू आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी व पुरोगामी विचारधारेवर चालणारे सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व तथा मार्गदर्शक ॲड.सचिन वाघ यांच्या या बिनविरोध निवडीबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. कायद्याच्या क्षेत्रातील ज्येष्ठ फौजदारी वकील म्हणून त्यांचा प्रदीर्घ अनुभव,अभ्यासू वृत्ती,सर्वसमावेशक नेतृत्व आणि सहकाऱ्यांशी असलेला जिव्हाळ्याचा संवाद यामुळे त्यांच्यावर वकील बांधवांनी व्यक्त केलेला विश्वास ही त्यांच्या कार्याची पोचपावती आहे. बारामती वकील संघटनेचे अध्यक्ष म्हणून ते न्यायव्यवस्था,वकील बांधवांचे हित,संघटनेची सर्वांगीण प्रगती आणि न्यायव्यवस्थेतील सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रभावीपणे कार्य करतील,तसेच सर्वांचा विश्वास सार्थ ठरवतील,असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## डॉ. डी. वाय. पाटील बी-स्कूलच्या माजी संचालकाविरुद्ध गुन्हा

पिंपरी (दै. संध्या)



डॉ. डी. वाय. पाटील बी-स्कूल, ताथवडे, पुणे येथील माजी संचालक डॉ. अमोल आनंदराव गावंडे यांच्याविरुद्ध संस्थेच्या सुमारे ₹१४ कोटी ९८ लाख ६६ हजार निधीच्या कथित अपहारासह संस्थेची गोपनीय माहिती (डेटा) चोरणे आणि इलेक्ट्रॉनिक पुरावे नष्ट केल्याप्रकरणी वाकड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आर्थिक गुन्हे शाखेकडे प्राप्त झालेल्या तपास अर्जावर प्राथमिक चौकशी करण्यात आल्यानंतर ४ जुलै २०२६ रोजी हा गुन्हा नोंदविण्यात आला. संस्थेच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या अधिकृत तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

संस्थेला प्राप्त झालेल्या अंतर्गत लेखापरीक्षण (इंटरनल ऑडिट) अहवालात डॉ. गावंडे यांनी संचालक म्हणून कार्यरत असताना पदाचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचा तसेच जवळपास ₹४.९८ कोटींचा कथित अपहार केल्याचा उल्लेख असल्याचे समोर आले आहे. याशिवाय संस्थेचा गोपनीय डेटा बेकायदेशीररीत्या हस्तगत करणे आणि इलेक्ट्रॉनिक पुरावे नष्ट करण्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३१६(४), ३१८(४), २४८, ३३६ आणि ३४० तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ४३, ६६ आणि ७२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू असून, कथित आर्थिक गैरव्यवहाराचे संपूर्ण स्वरूप उघड करणे, निधीच्या व्यवहारांचा मागोवा घेणे तसेच चोरीला गेल्याचा आरोप असलेला डेटा परत मिळविण्यासाठी सखोल तपास सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तपासासाठी हजर राहण्याबाबत पोलिसांनी डॉ. अमोल गावंडे यांना अनेक वेळा समन्स बजावले होते. मात्र त्यांनी चौकशीस अपेक्षित प्रतिसाद दिला नसल्याचे समोर आले आहे. तसेच ते सध्या भारताबाहेर असून दुबई येथे वास्तव्यास असल्याची माहिती तपास यंत्रणेला मिळाली आहे. या संदर्भातील अधिकृत तपास सुरू असून, पुढील कारवाई तपासाच्या निष्कर्षानुसार करण्यात येणार आहे.

## पुरंदर तालुका ग्रामपंचायत अधिकारी युनियनची कार्यकारिणी बिनविरोध

पुरंदर (दै. संध्या)

पुरंदर तालुका ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणीची निवड नुकतेच बिनविरोध करण्यात आली.सर्व पदाधिकारी व सदस्यांची एकमताने निवड झाल्याने युनियनमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी प्रभाकर पवार,सचिवपदी रमेश राऊत,उपाध्यक्षपदी अमित जाधव,महिला उपाध्यक्षपदी उज्वला हिंगणे,कार्याध्यक्षपदी महेंद्र लोणकर,महिला कार्याध्यक्षपदी माधवी हरपळे, कोषाध्यक्षपदी शीतल भुजबळ आणि प्रसिद्धी प्रमुखपदी सुरेश जगताप यांची निवड झाली.तसेच सदस्य म्हणून विठ्ठल धायगुडे, शरद पोमणे,नानासाहेब गरड, स्वाती झगडे, रवींद्र पिसे आणि वैशाली पानसरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.





या निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून पुणे जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे कार्याध्यक्ष संदीप ठवाळ, बारामती तालुका ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे अध्यक्ष दिपक बोरावके उपस्थित होते. त्यांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व सुरळीत पार पाडली. यावेळी पुणे जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेचे संचालक विलास बडदे, पुणे जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे प्रसिद्धी प्रमुख पुंडलिक म्हस्के, माजी अध्यक्ष रोहित अभंग, माजी सचिव विश्वनाथ खंडाळे तसेच युनियनचे इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. ग्रामपंचायत अधिकारी वर्गाच्या समस्या सोडविणे, संघटन अधिक सक्षम करणे आणि सदस्यांच्या हितासाठी प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला.

## चाकण एसटी बस स्थानकात दिवसा भाईंची वर्दळ




"चाकण एसटी बस स्थानकात सर्वांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने गस्त वाढविण्याची गरज आहे. सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करून दादागिरी करणाऱ्या भाईंवर कठोर कारवाई करण्याची गरज आहे."
**- हर्षद लेंडघर, नगरसेवक, चाकण**

चाकण (दै. संध्या)

### सायंकाळनंतर तळीरामांचा कहर

बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर गेल्या दहा वर्षांपूर्वी नव्याने बांधण्यात आलेल्या चाकण एसटी बस स्थानकात दिवसा भाईंची वर्दळ, तर सायंकाळ नंतर तळीरामांचा कहर सुरू असल्याने प्रवासी व नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. टवाळखोरांचा अड्डा म्हणून प्रसिद्ध असलेले चाकण एसटी बस स्थानक आता तरुणी आणि महिलांसाठी असुरक्षित वाटू लागले आहे. बस स्थानक परिसरात रोडरोमियो आणि सडकसख्या हऱ्यांचा उपद्रव वाढत चालला आहे. दिवसा भाईंची वर्दळ आणि सायंकाळ नंतर तळीरामांचा कहर सुरू असल्याने प्रवासी, नव विवाहित महिलांची कुचंबना होत आहे. धक्कादायक म्हणजे या ठिकाणी वाढत्या दुर्गंधीने प्रवाशांचा श्वास गुदमरला असून, असुविधांचे आगर म्हणून चाकण एसटी बस स्थानकाची ओळख आहे.

चाकण एसटी बस स्थानकात बऱ्याच दिवसांपासून गुंड प्रवृत्तीच्या तरुणांची गर्दी वाढू लागली आहे. शिवीगाळ, दमदाटी, प्राणघातक हल्ले, किरकोळ कारणावरून वाद होत आहेत. विशेष म्हणजे या ठिकाणी पिण्यासाठी स्वच्छ पाणी नाही. स्वच्छता गृह बंद असते. चाकण एसटी बस स्थानक हे असुविधांचे आगर म्हणून समस्यांच्या गर्तेत अडकलेले आहे.

चाकण एसटी बस स्थानकाच्या इमारतीत असलेल्या व्यवसायिक गाळ्यालगत दिव्यांग, मतिमंद, वेडसर व तळीरामांचा कहर सुरू असतो. बस स्थानकाच्या आवारात तळीराम बाकड्यावर लोळत असल्याने इतरांना त्यांचा मनस्ताप सहन करावा लागतो. याकडे कोणाचे लक्ष नाही, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. एसटी बस स्थानक आवारात यापूर्वी अनेक छोट्या मोठ्या घटना घडल्या आहेत. दोन दिवसांपूर्वी पाच जणांच्या टोळक्याने येथे एका युवकास बेदम मारहाण केल्याची घटना घडली होती. महिलांचे दागिने लांबविण्याच्या घटना समोर आल्या आहेत.

## बारामती येथे 'सीडस् ऑफ इन्सपायरेशन' विषयावर व्याख्यान संपन्न

### परिस्थिती कशीही असो खचू नका; संकटांना सामोरे जाण्याची क्षमता अंगी विकसित करा : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

बारामती (दै. संध्या)

■ 'बहूजन हिताय बहूजन सुखाय' प्रमाणे समाजाच्या उन्नतीसाठी काम करा : खासदार सुधा मूर्ती



प्रत्येकाच्या जीवनात विविध अध्याय असतात, परिस्थितीप्रमाणे जीवन बदलत जाते, त्यामुळे जीवनात कुठल्याही परिस्थितीत हार मानू नका; अनुकुल वा प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जाण्याची क्षमता अंगी विकसित करा, असा सल्ला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विद्यार्थ्यांना दिला. यापुढे जनसेवा आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्याचा मानसही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

ग. दि. मा. सभागृह, विद्यानगरी येथे 'सीडस् ऑफ इन्सपायरेशन' विषयावर आयोजित व्याख्यान्यात त्यांनी मार्गदर्शन केले. खासदार तथा ज्येष्ठ समाजसेविका पद्मविभूषण सुधा मूर्ती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, नगराध्यक्ष सचिन सातव, विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त राजीव शहा, ॲड. निलीमा गुजर, विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, शिक्षक, पालक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, सुधा मूर्तीनी संपूर्ण जीवन लोककल्याकरिता अर्पण केले आहे. त्यांचे देशभरात समाजसेवेचे कार्य सुरु आहे. त्यांच्या जीवन कार्यातून प्रेरणा, उर्जा मिळते. आयुष्यात सतत नवनवीन शिकत राहण्यासह त्याचा समाजाकरिता उपयोग केला पाहिजे.

आज त्यांचे बारामतीकरांना अत्यंत मोलाचे मार्गदर्शन लाभले, त्यांचे मार्गदर्शन हीच आपल्याकरिता स्फूर्ती आहे. आजचा दिवस येथील नागरिकांकरिता आनंदाचा आणि सुर्वणाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा आहे. बारामतीच्या विकास त्यांनी स्वत: अनुभवला असून त्या बारामती येथील विद्यार्थी, नागरिकांच्या प्रेमात पडल्या असून आगामी काळात बारामतीत परत येणार आहेत, असेही श्रीमती पवार म्हणाल्या.

श्रीमती मूर्ती म्हणाल्या, विद्यार्थीजीवनात चांगल्या गोष्टींचे अनुकरण केले पाहिजे. चांगल्या सवयी जीवनभर उपयोगी पडतात त्यामुळे जीवनात यशस्वी होण्याकरिता स्वत:सह परिसर स्वच्छता, नीटनेटकेपणा, संयम आदी गुणांचे पालन करण्यासह वेळेच नियोजन, शिस्तीचे पालन, कठोर परिश्रम, निर्णय घेण्याची क्षमता अंगी विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. उपयोजनात्मक विज्ञान समाजात बदल घडवून आणते. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या उक्तीप्रमाणे समाजाच्या उन्नतीसाठी काम करावे.

त्यापुढे म्हणाल्या, विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आण्यामागे शिक्षकांचा मोठा वाटा असतो, पालकांसह शिक्षकांनीही मुलांवर चांगले संस्कार केले पाहिजे. मुलांच्या क्षमतेप्रमाणे त्यांच्या स्वप्नपूर्तीकरिता प्रयत्न करु द्या, तुमच्या अपेक्षा त्यांच्यावर लादू नका. फुलाच्या कळीप्रमाणे नैसर्गिकरित्या त्यांचे जीवन फुलू द्या, अशा सल्ला श्रीमती मूर्ती यांनी दिला.

विद्यार्थ्यांनो, जीवन सोपं किंवा कठीण नाही, जीवनात यश अपशय येत असते , अपयशामुळे खचून जाऊ नका. संकटाच्या काळात धैर्याने वाटचाल करुन विविधांगी जीवनाचा आनंद घ्या. स्वत: कुटुंब, मातृभाषा, शाळा, महाविद्यालय, राज्य, देशावर प्रेम करा तसेच आई-वडील, शिक्षक, वयोवृद्ध नागरिकांचा आदर करा, असा सल्ला श्रीमती मुर्ती यांनी दिला.

विद्येच्या जोरावर आजच्या युगात महिला विविधांगी भुमिका सांभाळण्यासोबतच विविध क्षेत्रात पुरुषांच्या खाद्यांला खादा लावून काम करीत आहे. बदल्या काळानुसार कृत्रिम बुद्धीमत्ता, रोबोटिक्सचे शिक्षण उपयुक्त असून ते स्वीकारले पाहिजे. शेतकरी हा देशाचा कणा आहे, त्यामुळे कृषी क्षेत्रातही नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले पाहिजे, असेही श्रीमती मुर्ती म्हणाल्या.

## क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट कायद्याला आयएमएचा इशारा

### लहान-मध्यम रुग्णालये, नर्सिंग होम्स बंद होण्याची भीती

पुणे (दै. संध्या)

"राज्य आयएमएने मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांना चर्चेसाठी निवेदने दिली आहेत. आम्ही कायद्याच्या सकारात्मक अंमलबजावणीसाठी चर्चा करण्यास तयार आहोत. मात्र, सरकारने चर्चेविना एकतर्फी कायदा मंजूर केल्यास महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना व इतर योजनांवर बहिष्कार टाकून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल व राज्यव्यापी संपावर जावे लागेल."
**- डॉ. संतोष कुलकर्णी, अध्यक्ष, राज्य आयएमए**

महाराष्ट्र वैद्यकीय आस्थापना नोंदणी व नियमन कायदा 2026 (क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट) च्या अंमलबजावणीपूर्वी राज्य सरकारने वैद्यकीय संघटनांशी चर्चा करावी. प्रस्तावित विधेयकामुळे राज्यातील लहान व मध्यम रुग्णालये, नर्सिंग होम्स आणि ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची व बंद पडण्याची शक्यता इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) शाखेने वर्तवली आहे. राज्य शासनाकडून वैद्यकीय आस्थापना नोंदणी व नियमन कायदा मंजूर करण्याची शक्यता आहे. या विधेयकाला विरोध नाही मात्र, ते मंजूर करण्यापूर्वी शासनाने आयएमए तसेच वैद्यकीय संघटनांसोबत चर्चा करावी, असे राज्य आयएमए शाखेचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी पत्राद्वारे म्हटले आहे. विधेयक घाईघाईने मंजूर न करता विधिमंडळाच्या संयुक्त समितीकडे छाननीसाठी पाठवावे; अन्यथा राज्यव्यापी संप पुकारून सरकारी आरोग्य योजनांवर बहिष्कार टाकू, असा इशारा संघटनेने दिला आहे. या विधेयकांतर्गत स्थापन होणाऱ्या परिषदा, प्राधिकरणे व अपील यंत्रणांमध्ये प्रत्यक्ष आरोग्यसेवा देणारे डॉक्टर, लहान व मोठ्या रुग्णालयांचे प्रतिनिधी व वैद्यकीय संघटनांचे प्रतिनिधित्व असणे आवश्यक आहे. ज्यांच्यावर हा कायदा लागू होणार आहे त्यांच्या सहभागाशिवाय, विचारविनिमयाशिवाय तो लागू करू नये, अशी संघटनेची मागणी आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, या विधेयकामध्ये सरकारी व खासगी रुग्णालयांसाठी वेगवेगळे नियम आहेत. यामध्ये, रुग्णसुरक्षा, उपचारांचा दर्जा, पारदर्शकता व उत्तरदायित्व ही उद्दिष्टे सर्व आरोग्यसंस्थांसाठी समान असायला हवीत.

### काय आहेत मागण्या?

- दवाखान्यांना त्यांच्याकडे उपलब्ध सुविधा, मनुष्यबळ, तज्ज्ञ या सर्व क्षमतेनुसारच रुग्णाला स्थिर करण्याची जबाबदारी द्यावी
- क्षमतेबाहेर उपचाराची सक्ती केल्यास रुग्णाचा जीव धोक्यात येऊ शकतो
- अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या रुग्णालयांना केवळ तात्पुरती नोंदणी देणे अन्यायकारक आहे.